। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २४१ वा । सोमवार दिनांक ०८ डिसेंबर, २०२५ । पृष्ठ ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### निष्काळजीपने अग्नी प्रज्वलीत करणाऱ्यांवर गुन्हे दाखल

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत सार्वजनिक रस्त्याचेकडेला हातगाड्यावरील शेगडीवर निष्काळजीपने अग्नि प्रज्वलीत कणाऱ्यांवर परंडा पोलीसांनी दि. ०५ डिसेंबर रोजी ०९.३० ते १९.४० वा. दरम्यान कारवाई केली. आवारपिंपरी ता. परंडा जि. धाराशिव येथील ग्रामस्थ- संभाजी , आनंद रा. रगडे वस्ती उपळाई ठोंगे ता. बार्शी जि. सोलापूर,युवराज रा. सिरसाव ता. परंडा जि. धाराशिव, ब्रम्हदेव रा. कुंभेफळ ता. परंडा जि. धाराशिव यांनी हॉटेल आनंद येथे रोडचे बाजूस वारदवाडी फाटा ते बस्थानक आवारपिंपरी रोडलगत व वारदवाडी ते भुम जाणारे रोडलगत सिरसाव फाटा येथे व कुंभेफळ येथील जि.प. प्रा. शाळेजवळ हॉटेल सिध्देश्वर भेळ स्टॉल सेंटर साकत ते परंडा जाणारे रोडचे उजवे बाजूस कुंभेफळ येथे आपल्या हातगाड्यावरील शेगडीवर निष्काळजीपने अग्नि प्रज्वलीत करुन पदार्थ तयार करत असताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तींविरध्द ` परंडा पो.ठा. येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

तसेच बेंबळी पोलीस ठाणे अंतर्गत सार्वजनिक रस्त्याचेकडेला हातगाड्यावरील शेगडीवर निष्काळजीपने अग्नि प्रज्वलीत कणाऱ्यांवर बेंबळी पोलीसांनी दि. ०५ डिसेंबर रोजी कारवाई केली. करजखेडा ता. जि. धाराशिव येथील ग्रामस्थ-दयानंद यांनी करजखेडा येथे ग्रामपंचायत कार्यालयाच्या बाजूस पाटोदा जाणारे रोडच्या बाजूस आपल्या हातगाड्यावरील शेगडीवर निष्काळजीपने अग्नि प्रज्वलीत करुन पदार्थ तयार करत असताना बेंबळी पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तींविरध्द बेंबळी पो.ठा. येथे गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

### सोन्या-चांदीच्या दागिण्याची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- जयश्री पंडीत बिराजदार, वय ६५ वर्षे, रा. जकेकुर ता. उमरगा जि. धाराशिव यांचे राहते घराची कडी अज्ञात व्यक्तीने दि.०३.१२.२०२५ रोजी कापून आत प्रवेश करुन कपाटातील १९ ग्रॅम सोन्याचे सोन्याचे दागिने व चांदीचे दागिने असा एकुण ५५,५०० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-जयश्री बिराजदार यांनी दि.०५.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### ‘तडजोड शुल्क’वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०५ डिसेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २७६ कारवाया करुन २,१२,५५० ‘तडजोड शुल्क’वसुल केले आहे.

## धाराशिव प्रशालेत ज्येष्ठ समाजवादी नेते पन्नालाल सुराणा यांना श्रद्धांजली



धाराशिव (प्रतिनिधी)- राष्ट्र सेवा दलाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष तथा ज्येष्ठ समाजवादी नेते साथी पन्नालाल सुराणा यांना धाराशिव प्रशालेत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

शनिवारी (दि. ६) धाराशिव प्रशालेच्या सभागृहात शोकसभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अरविंद गोरे, उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष वसंतराव नागदे, छत्रपती शिवाजी हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक एम. डी. देशमुख, जिल्हा स्वातंत्र्य सैनिक समितीचे उपाध्यक्ष अण्णासाहेब जाधव, सचिव दिलीप गणेश, ॲड. सुग्रीव नेरे, ॲड. चित्राव गोरे, ॲड. निलेश बारखेडे, राष्ट्र सेवा दलाचे अजय वाघाळे, डीसीसी बँकेचे माजी कार्यकारी संचालक हणमंत भुसारे, सिद्धेश्वर बेलुरे, विलास वकील, गुंडू पवार, बालाजी जाधव, बिभीषण कुदळे, मुख्याध्यापक पंडित जाधव, उषा माने, काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत पाटील, शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, अब्दुल लतिफ यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शोकसभेत उपस्थित मान्यवरांनी साथी पन्नालाल सुराणा यांच्या आठवणींना उजाळा देत आपल्या भावना व्यक्त केल्या. जिल्हा स्वातंत्र्य सैनिक समितीचे सचिव दिलीप गणेश यांनी धाराशिव प्रशाला उभारणीच्या कामात साथी पन्नालाल सुराणा यांनी दिलेल्या योगदानाचा उल्लेख करताना त्यांना अश्रू अनावर झाले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सुरेश शेळके यांनी साथी पन्नालाल सुराणा यांच्या कार्याचा आदर्श घेऊन देहदानाचा संकल्प केला.

प्रारंभी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अजय वाघाळे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षक रमण जाधव यांनी केले. खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## स्वआधार मतिमंद मुलींच्या बालगृहात जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा

धाराशिव (जिमाका) जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धाराशिव,दिव्यांग कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन आणि जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त तुळजाई प्रतिष्ठान संचलित स्वआधार मतिमंद मुलींचे बालगृह,विमानतळ रोड,आळणी येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.

हा कार्यक्रम जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती अभिश्री देव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश श्रीमती भाग्यश्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आले अध्यक्षस्थानी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी देवदत्त गिरी यांनी भूषविले.तसेच श्री.सचिदानंद बांगर (वै. सा.का.,जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी,जिल्हा परिषद धाराशिव),डॉ. निखील नवले (न्यूरोलॉजिस्ट),सरकारी वकील ऍड. गुंड,ॲड.गोरेख कस्पटे,स्वामी समर्थ मुकबधीर शाळेचे मुख्याध्यापक ऍड. गाडे,शकील शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मतिमंदतेचे जनक म्हणून ओळखले जाणारे जीन मार्क इटार्ड यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर बालगृहातील मुलींनी मंगल स्वागतगीत सादर केले आणि पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत केले.

गेल्या सहा-सात वर्षांपासून बालगृहातील मुलींना विनामूल्य वैद्यकीय सेवा देणारे डॉ.निखील नवले यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या सेवेमुळे मुलींमध्ये होत असलेल्या सकारात्मक बदलांची नोंद घेऊन मान्यवरांनी त्यांचा गौरव केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुळजाई प्रतिष्ठानचे सचिव श्री.शहाजी चव्हाण यांनी केले.दिव्यांग विशेष बालकांसाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यानंतर सचिव श्रीमती भाग्यश्री पाटील यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचा मोफत टोल फ्री क्रमांक १५१००,बौद्धिक व मानसिक विकलांगांसाठीचा १४४४६,तसेच बालकांसाठीची मदतवाणी १०९८ या महत्वाच्या सेवांची माहिती देत दिव्यांगांच्या हक्क व कायद्यांविषयी मार्गदर्शन केले.

बालगृहातील मुलींनी सादर केलेल्या मनमोहक सामूहिक नृत्याने सर्वांचे मन मोहून घेतले.त्यानंतर मान्यवरांनी मुलींना फळवाटप केले तसेच दिव्यांग दिनानिमित्त घेण्यात आलेल्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांतील विजेत्या मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन रूपाली कांबळे यांनी केले तर आभार निकिता माने यांनी मानले.

## जळकोटच्या श्री कुलस्वामिनी आश्रम शाळेत महापरिनिर्वाण दिन साजरा



जळकोट (विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी श्री प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा व राजर्षी शाहू कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय जळकोट यांच्या संयुक्त विद्यमान भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ जळकोट चे सचिव तथा प्राचार्य संतोष चव्हाण साहेब व प्रमुख पाहुणे प्राथमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती आशा पवार मॅडम कुलस्वामिनी माध्यमिक आश्रम शाळेचे जेष्ठ शिक्षक श्री नागेंद्र गुरव सर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री खंडेराव कारले सर यांनी केले .इयत्ता आठवीतील कुमारी ऊर्मिला चव्हाण, राणी चव्हाण पाचवीतील कुमारी हुमेरा जमादार, अकरावी विज्ञान वर्गातील कुमारी संस्कृती गायकवाड या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली . व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री संतोष चव्हाणसाहेब यांनी बोलताना माणसाला माणसाप्रमाणे वागणूक मिळाली पाहिजे जातीपातीच्या नावाखाली अन्याय अत्याचार करू नये शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे शिका, संघटित होऊन संघर्ष करा शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो प्राशन करील तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही त्यामुळे चांगले शिक्षण घ्यावे माणसाला माणूस पण हे शिक्षणमुळे मिळते. यावेळी श्री सुरेश कोकाटे सर, श्री संतोष दुधभाते सर, श्री बालाजी राठोड सर ,श्री अप्पासाहेब साबळे सर ,श्री सागर चव्हाण सर, श्रीमती शांताबाई चौगुले मॅडम, श्रीमती अश्विनी लबडे, कुमारी मयुरी कांबळे मॅडम उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री देवानंद पांढरे सर श्री बिळेणसिद्ध हक्के सर, किरण कांबळे सर,किरण ढोले सर ,दुर्गेश कदम सर यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कल्पना लवंद मॅडम आभार श्रीमती प्राध्यापिका प्रमिला कुंचगे मॅडम यांनी मानले.

## नगरपालिका आणि नगरपंचायत क्षेत्रातील शेतकऱ्यांना MREGS योजनांचा त्वरित वैयक्तिक लाभ मिळावा - खासदार ओमराजे निंबाळकर




नवी दिल्ली - महाराष्ट्रातील नगरपालिका आणि नगरपंचायत क्षेत्रात वास्तव्यास असलेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या महात्मा गांधी ग्रामीण राष्ट्रीय रोजगार हमी योजनांचा माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजनांचा समान हक्काने लाभ मिळावा, अशी ठाम मागणी आज लोकसभेच्या शून्य प्रहरामध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केंद्र सरकारकडे केली.

खासदार निंबाळकर यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की या नगरपालिका हद्दीमध्ये वास्तव्यास असणाऱ्या हजारो कुटुंबांची उपजीविका शेतीवर अवलंबून असूनही, त्यांना केवळ नगर पालीका क्षेत्रात वास्तव्यास असल्यामुळे अनेक चठएऋड योजनेच्या पात्रतेतून वगळल जाते. त्यामुळे शेतकरी विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहतो.

**खासदार निंबाळकर यांनी सभागृहात स्पष्टपणे नमूद केले:**

नगरपालिका आणि नगरपंचायत क्षेत्रातील शेतकऱ्यांना शेतरस्ते, गाय-गोठा, वैयक्तिक विहीर, फळबाग लागवड, तुती लागवड यांसारख्या MREGS योजनांचा त्वरित लाभ द्यावा. ग्रामीण भागातील शेतकरी आणि नगरपालिका क्षेत्रातील शेतकरी यांच्यात असा भेदभाव होऊ नये.

त्यांनी पुढे सांगितले की-शासनाच्या कृषी अनुदान, पायाभूत सुविधा आणि पशुपालन योजनांचा विस्तार या भागात केला तर:

शेती उत्पादन आणि उत्पन्न वाढेल

* पाणी व सिंचन व्यवस्थेत सुधारणा होईल
* फळबाग आणि तुती लागवड प्रोत्साहनामुळे टिकाऊ शेती उभी राहील
* पशुपालनावर आधारित आर्थिक स्वावलंबन तयार होईल

खासदार निंबाळकर यांनी केंद्र सरकारकडे केलेल्या प्रमुख मागण्या:

१. नगरपालिका क्षेत्रातील शेतकऱ्यांना ग्रामीण क्षेत्रातील शेतकऱ्यांप्रमाणे समान लाभ द्यावा

२. सर्व कृषी व पशुसंवर्धन संबंधित योजना या क्षेत्रांसाठी तात्काळ खुल्या कराव्यात

३. निकष बदलून प्रत्येक पात्र शेतकऱ्याला अनुदान, मंजुरी व तांत्रिक मदत उपलब्ध करून द्यावी.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त बहुजन योद्धा सामाजिक संघटनेच्यावतीने महामानवास अभिवादन



धाराशिव (प्रतिनिधी)-भारतीय राज्य घटनेने शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त धाराशिव येथे बहुजन योद्धा सामाजिक संघटनेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

धाराशिव शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष धंनजय शिंगाडे, माजी नगराध्यक्ष खलीफा कुरेशी, मसुद शेख , इरफान कुरेशी, बाबा मुजावर, जीवन देशमुख, जालिंदर पांचाळ, खलील पठाण, विशाल शिंगाडे, असद पठाण, समय्योदुन मशयाक, पठाण सोहेब , शरनम शिंगाडे, पद्मात ओव्हाळ, सुगत सोनवणे, अविनाश शिंगाडे, नुरखा पठाण, मिलीद पेठे, जितेंद्र बनसोडे, इफ्तेकार मुजावर, शारिफुत शिंगाडे, ताहेर शेख, उद्धव कांबळे, सतिश बनसोडे, कलीम कुरेशी, रोहन शिंगाडे, धमपाल बनसू, चंद्रमणी बनसोडे, रावसाहेब शिंगाडे, आबा सुर्यवंशी, अँड परवेज काझी यांच्यासह विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- दिनांक ६ डिसेंबर रोजी आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचालित के. टी. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, धाराशिव येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अर्थपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा दिवस विद्यार्थ्यांना आणि शिक्षकवर्गाला सामाजिक समता, मानवाधिकार आणि न्याय या मूल्यांची पुनः जाणीव करून देणारा ठरला. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. अमोल जोशी यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. यावेळी सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि महाविद्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.डॉ. अमोल जोशी यांनी उपस्थितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा सखोल आढावा दिला. त्यांच्या विचारांनी भारतीय समाजाला दिलेला नवा दिशा-बोध, सामाजिक सुधारणा, अस्पृश्यता निर्मूलन, शिक्षणाचे महत्त्व, महिलांच्या हक्कांसाठी केलेले कार्य तसेच भारतीय संविधानातील त्यांच्या मूलभूत भूमिका यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकवर्गाने मोठ्या उत्साहाने व शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग नोंदवूनमहापरिनिर्वाण दिनाचा संदेश-ज्ञान, समता आणि सामाजिक न्याय-प्रत्यक्ष कृतीतून व्यक्त केला.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रासेयोचे कार्यक्रमाधिकारी प्रा. अतुलकुमार अलकुंटे,प्रा.पल्लवी हंगरगेकर, प्रा. प्रसाद मेनकुदळे, स्वयंसेवक तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## वाढती बेरोजगारी एक गंभीर समस्या

देशात काय आता महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी सतावत आहे. जागतिक मंदीचा थोड्याफार प्रमाणात फटका बसत आहे. त्याच प्रमाणे अमेरिकेचे धोरणाचा झळ अधिक जाणवत आहे. ट्रम्प यांचे धोरणामुळें अनेक कंपन्या बंद पडत असल्याची चर्चा असून यामध्ये काम करणाऱ्यांची संख्या अधिक आहे. त्यामुळे बेरोजगार वाढले जाण्याची शक्यता आहे. देशात बेरोजगारांना काम देण्यासाठी पक्के धोरणाचा अभाव आहे. आता भारतात मोठ्या प्रमाणात शिक्षण घेणाऱ्याचे प्रमाणात वाढ झाली आहे. प्रत्येक घरात शोधले तर प्रत्येकजन शाळेत जाणारे दिसून येतील. शिक्षणाचा प्रचार मोठ्या प्रमाणात झाल्याने शिक्षण घेणाऱ्याचे प्रमाणात वाढ झाली आहे. शिक्षणामुळे अनेक उच्च शिक्षित तरूण व तरूणींचा समावेश आहे. डॉक्टर होणारी मंडळी अधिक आहे, त्यापेक्षा विविधि क्षेत्रात इंजिनियर होण्याचे प्रमाण अधिक आहे. विविध क्षेत्रात जसे सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक अशा विविध क्षेत्रात इंजिनियर मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. पदवी घेणाऱ्याची संख्या अधिक आहे तर नोकरीच्या जागा कमी आहेत. त्यात काही आयटी क्षेत्रातील कंपन्या बंद पडल्याने बेरोजगारीत वाढ झाली आहे. अल्पशिक्षितांची प्रमाण मोठे आहे. त्यामुळे एक कार्यक्रम तयार करून बेरोजगारांच्या हाताला काम कसे देणार या बाबत विचार झाला पाहिजे. एकतर उद्योग-धंदे काढायाचे झाले तर आर्थिक मदतीची गरज भासते. पैसा उभा करावयाचा कसा हा सर्वात मोठा प्रश्न समोर उभा राहातो. बँका ज्यांच्याकडे पत आहे. स्थावर मालमत्ता आहे आशांना मदत देते. बाकीच्याना उभा राहू देत नाही. मुळात बेरोजगार निर्मुलनासाठी विशेष कार्यक्रमाची मोठी गरज आहे. देश मोठा आहे. तशाच देश चीनही आहे. चीनमध्ये कोणीही बसे नाहीत तर काम करणारी पिढी आहे. हाताला जे काम मिळेल ती करणारी मंडळी आहे. चीन व भारतीयांची तुलना केल्यास बरेच लक्षत्तत येते, मुळात प्रथम विचार करावा ते म्हणजे आपण स्वत: होवुन काही तरी करण्याची जिद्द हवी. त्याच प्रमाणे कामाचा शोध! घरबसल्या कोणी काम देणार नाही. कामाच्या शोधात अनेक बाबी कळून येतात. आज अनेक गरजा आहेत. त्याची पुर्तता करण्यासाठी वस्तू तयार कराव्या लागतात. आज ठराविकांच्या हाती अनेक व्यवसाय आहेत. त्याच्या मागे न लागता. आपण वेगळा प्रॉडक्ट निर्माण केला पाहिजे. आपली वेगळी छाप निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज काही क्षेत्रात माणसे मिळत नाहीत अशा क्षेत्रात घुसण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अनेक क्षेत्रापेक्षा भारत हा कृषी प्रधान देश आहे. मुख्य व्यवसाय शेती आहे. अशा शेतीत काम करणारी मंडळीचा अभाव आहे. यंत्राणे कितीही काम करीत असले तरी यंत्र चालविणारा हा माणूस आहे हे पहिल्यांदा लक्षात ठेवले पाहिजे. शेतीत विविध उत्पादने काढू शकतोत. सोयाबिनला भाव नाही. मात्र सोयाबिनपासून अनेक पदार्थ तयार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज जे बाजारात पनीर येते ते सोयाबिनपासून बनविलेले असते. दुध एवढ्या मोठ्या प्रमाणात आपल्या राज्यात निर्माण होऊ शकत नाही. त्यामुळे आपल्या शेतीतील मालावर आपण काही प्रक्रिया करण्याचा प्रयत्न करून त्याला मार्केट मिळविण्याचा प्रयत्न केला पहिजे. शेतीतील प्रत्येक बाब विक्री केली जाते तसेच उपयोगाला येते. त्याचा विचार केला जात नाही. त्याला जोड धंदा केलातर अधिक चांगले. जोडधंद्यास भांडवल लागते. ते आणायाचे कोठून त्यामुळे आहे त्या शेतातील टाकाऊ माल बिकाऊ बनविला पाहिजे. त्यामुळे आता हाताला काम नाही असे म्हणत बसण्याची वेळ येऊ नये. केले तर अनेक कामे हाती लागतात. जर नकारात्मक विचाराने वाटचाल करीत असाल तर कोणतेही यश मिळू शकत नाही. त्यामुळे वेळीच विचार करून बेरोजगारवर कशा प्रकारे मात करता येईल याचा विचार केला पाहिजे. देशात बेरोजगाराची संख्या वाढत आहे. बेरोजगाराचे डोके फिरले तर वाईटाकडे वळले जाते. हिंसक बाबी हातून घडू शकतात. याचा विचार करून सरकारने सुद्धा या बाबतीत गांर्भीयाने विचार केला पाहिजे. सरकारला माहिती असेल की, आपण मोठ्या प्रमाणात बेरोजगारास काम देऊ शकत नाही. नौकऱ्या देऊ शकत नाही. त्या बदल्यात त्यांच्या हाती काम कसे मिळेल याचा विचार केला पाहिजे. मुळात आपल्या देशात बसे लोक अधिक आहेत. बसून खाणाऱ्यांची संख्या अधिक आहे. याबाबत विचार केला पाहिजे की, कोणीही बसून खाणारे नसावेत. त्यासाठी कामाला लावणे सध्याच्या परिस्थीत आवश्यक आहे. मुळात आपल्या देशात काही बाबीचा दिर्घ काळाचा विचार केला जात नाही. आजचे भागले मग उद्याचे नंतर बघू या तोऱ्यात राहाणारी मंडळी अधिक आहे. मुळात देशात सर्वात मोठा प्रश्न सध्याच्या स्थितीत बेरोजगाराचा आहे. हाती दिड हजार दिले म्हणजे काम संपले असे नाही. प्रत्येक महिलांना कुटीर उद्योगाला चालना दिली पाहिले. हाती बांगड्या भरणे. घरोघरी लहान-मोठे दुकाने काढून त्यातून जीवनाश्यक बाबी विक्री करण्याचा छंद चालविला पाहिजे. काम कधीही संपत नाही. ते सतत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अधिक शिकलेली मंडळी ही श्रम करण्यासाठी तयार नसते. त्यांची मानसिकता बदलण्याची गरज आहे. प्रत्येकजन कामात राहीला तर आपल्याबरोबर देशाचा विचार निश्‍चित होतो. बसे काही कामाचे नाहीत. उलट वाईट विचाराने डोके चालते, विनाकारण डोके भडकले जाते. त्यामुळे प्रत्येकास कामाची हमी देणे उचित आहे. बेरोजगार ही एक समस्या आहे ती सोडवली पाहिजे. सरकारने या बाबत एक कार्यक्रम तयार करून राबविला पाहिजे. नियोजन योग्य पद्धतीने केले तर निश्‍चित बेरोजगाराचा प्रश्न सोडविला जाऊ शकतो. काम करण्याची तयारी प्रत्येकाची असली पाहिजे. सरकारने या बाबत गंभीरतेने विचार करून वाटचाल करावी तरच बेरोजगाराची समस्या सुटू शकेल.

# नशिबाच्या पाऊलखुणांतून





नशिबाचे वळण जर्मनीतील बेकायदेशीर वास्तव्यात जगण्यासाठी संघर्ष करणाऱ्या आरव पाटील (भारतीय तरुण) ची कहाणी. खिशात पैसे आणि निवास परवाना नसताना, एका मेट्रो प्रवासात तो जगप्रसिद्ध अभिनेत्री मैसी विल्यम्स (आर्या स्टार्क) च्या शेजारी बसतो, पण उदासीन असल्याने तिला ओळखत नाही. एका व्हायरल फोटोमुळे तो जगाचे लक्ष वेधून घेतो. मासिकाच्या प्रश्नावर त्याचे भावूक उत्तर व्हायरल होते, ज्यामुळे त्याला नोकरी, कायदेशीर परवाना आणि जगण्याचा हक्क मिळतो. एका क्षुल्लक क्षणाने नियती कशी बदलते, हे या कथेतून दिसते.

जर्मनीच्या कडक हिवाळ्यातली ती सकाळ होती. बाहेर दाटून आलेलं धुके, जणू पांढरी शुभ्र चादर दगडी इमारतींच्या अंगावर पसरलेली. लोकांच्या चेहऱ्यावर कामाची गडबड, श्वासातून बाहेर पडणारी धुरासारखी वाफ आणि पायांखालील रस्त्यावर होणारी बर्फाची किर्र किर्र... इमारतींच्या उंच भिंतींच्या सावल्यांमध्ये, आरव पाटील नावाचा एक पंचविशीतला तरुण, त्याच्या आयुष्यातील सर्वात कठीण संघर्षाला तोंड देत होता. तो भारतीय होता, पण या अपरिचित देशात तो आता हरवून गेला होता; बेकायदेशीरपणे राहत होता.

गेले काही महिने त्याच्या चेहऱ्यावर पुरेशी झोप नव्हती, डोळ्यांत सतत असलेले प्रश्न, आणि मनात असुरक्षिततेची दडपण... त्याच्याकडे राहण्याचा परवाना नव्हता, खिशात एक युरो नव्हता आणि मनात पोलिसांच्या भीतीची सततची धास्ती होती. गर्दीत असूनही त्याचं मन अतिशय एकाकी होतं. तो फक्त जगण्याचा प्रयत्न करत होता रोजचं जेवण, राहायला जागा, आणि कोणाच्या हाती न लागणे. ''या भयाण थंडीत मी स्वतःला आणखी किती काळ सावरू शकेन?'' हा प्रश्न त्याला सतत छळत होता.

त्या सकाळी आरव मेट्रोमध्ये चढला आणि एका कोपऱ्यातील सीटवर बसला. ट्रेनच्या दारातून आलेल्या उबदार हवेशी त्याचं थरथरतं शरीर जणू दोन क्षण विसावा घेत होतं. तो कोपऱ्यात जाऊन शांतपणे बसला. त्याची नजर फक्त पायांवर स्थिरावलेली जणू जगाशी नातं संपलेलं होतं. भीती त्याच्या चेहऱ्यावर वाचली जाऊ नये, अशी त्याची तीव्र इच्छा असल्याने त्याची नजर खाली होती. त्याच्या शेजारी एक गोऱ्या रंगाची तरुणी येऊन बसली. तिचे केस मोकळे होते आणि ती शांतपणे आपल्या फोनमध्ये काहीतरी पाहत होती.

थोडा वेळात, गर्दीतून एक तरुणी आली आणि अगदी त्याच्या बाजूला येऊन बसली. सोनेरी केस, शांत हास्य आणि अगदी साधा पोशाख. परंतु तिच्या असण्याने एक वेगळं तेज जाणवत होतं. आरवला किंचितही कल्पना नव्हती की, ती तरुणी म्हणजे जगप्रसिद्ध मालिका गेम ऑफ थ्रोन्सची नायिका मैसी विल्यम्स (आर्या स्टार्क) होती. लाखो लोक तिच्यासोबत सेल्फी घेण्यासाठी स्वप्न पाहत असताना, आरव मात्र पूर्णपणे उदासीन होता. सेलिब्रिटीचं ग्लॅमर त्याच्या जीवनाच्या मूलभूत संघर्षापुढे अगदी अर्थहीन ठरले होते.

नेमक्या त्याच क्षणी, एका प्रवाशाने त्या दोन आसनांवर बसलेल्या दोन भिन्न जगांचा एक फोटो काढला. एका बाजूला हसतमुख, प्रसिद्धीच्या झोतात असलेली मैसी आणि दुसऱ्या बाजूला त्रासलेला, व्यथित आणि उदासीन आरव. हा फोटो क्षणात सोशल मीडियावर पसरला.

फोटोखाली हजारो प्रतिक्रिया आल्या: ''आर्या स्टार्कच्या शेजारी हा शांत मुलगा कोण आहे?'', ''त्याच्या चेहऱ्यावर इतकी वेदना का आहे?'' अचानक, एक अनामिक तरुण, संपूर्ण जर्मनीसाठी एक गूढ व्यक्तिमत्त्व बनला. जग त्याच्याकडे लक्ष देत होतं, पण आरवला याची अजिबात कल्पना नव्हती; तो तर अजूनही रात्रीच्या जेवणाची चिंता करत होता.

नशीब अचानक तयार होत नाही. ते तर आपल्याच पावलांनी विणलेलं जाळं असतं. प्रत्येक चुकीच्या वळणातून पुढचा योग्य रस्ता तयार होत असतो. प्रत्येक अडचण ही पुढच्या संधीचं दार असते. जणू कोणीतरी हातात पेन घेऊन जीवनाची पटकथा लिहितोआपल्याला न दिसणारं, पण आपल्यासोबत सतत धावणारं. आरवला मैसी विल्यम्सचा परिचय नव्हतापण नियतीला मात्र आरवचा परिचय होताच.

प्रसिद्ध जर्मन मासिक ''डेर स्पीगल'' ने आरवचा शोध घेण्याचे आव्हान स्वीकारले. आठवड्याभरात, पत्रकारांनी आरवला म्युनिकमधील एका पडक्या इमारतीच्या तळमजल्यावरील खोलीत शोधून काढले. पत्रकारांनी त्याला फोटो दाखवला आणि प्रश्न केला, ''तुमच्या शेजारी बसलेली व्यक्ती कोण होती, हे तुम्हाला माहिती आहे का? तिचे लाखो चाहते आहेत, पण तुम्ही अजिबात प्रतिक्रिया दिली नाही. का?'' आरव काही क्षण शांत राहिला. त्याच्या डोळ्यांत गरिबी आणि भीती यांची एक खोल वेदना होती. त्याने शांत, पण मन हेलावून टाकणारे उत्तर दिले:

''जेव्हा तुमच्याकडे राहण्याचा परवाना नसतो, खिशात एकही युरो नसतो आणि तुम्ही दररोज ट्रेनमध्ये 'बेकायदेशीरपणे' प्रवास करता, तेव्हा तुमच्या शेजारी कोण बसते याची पर्वा करण्याचीही ताकद उरत नाही.''

त्याच्या प्रामाणिक उत्तराने पत्रकार पूर्णपणे निशब्द झाले. आरव ज्या नजरेने जगाकडे पाहत होता, ती दृष्टी जगाला कधीच दिसली नव्हतीकारण अशा नजरा कमालीच्या शांत असतात, पण आतून कल्लोळ करत असतात. मासिकाने त्याला पोस्टमनची नोकरी दिलीमहिन्याला ८०० युरो. त्या एका नोकरीच्या करारामुळे त्याला मिळाला: कायदेशीर निवास परवाना, स्थैर्य, आणि सर्वात महत्त्वाचं''स्वतः साठी'' जगण्याचा हक्क.

कधी ज्या मेट्रोमध्ये तो धास्तावलेला बसायचा, त्याच मेट्रोमध्ये आता तो निर्धास्त उभा राहू शकत होता. कधी ज्या रस्त्यांनी तो भीतीने चालायचा, त्याच रस्त्यांनी आता त्याच्या भविष्यातील स्वप्नांचे नकाशे उलगडले.



**-राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
**मो. ९८९०५७७१२८**

# सौर ऊर्जेचा वापरामुळे विजेच्या दरात कपात करणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेचा विक्रम, गिनीज बुकात नोंद




छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : देशात महाराष्ट्र हे सौर ऊर्जेचा शेतीत सर्वाधिक वापर करणारे राज्य ठरले आहे. शेतकऱ्यांसाठी फिडर सौर ऊर्जे वर आणून स्वतंत्र १६ हजार मेगावॅट वीज निर्मिती करु. त्यामुळे अन्य वापरातील विजेच्या दरात आपण दरवर्षी ३ टक्के कपात करुन ग्राहकांना स्वस्त वीज देऊ शकतो,असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे बोलताना केले.

**एका महिन्यात ४५ हजार ९११ कृषी पंप**

मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेत महाराष्ट्राने विश्वविक्रम केला आहे. महावितरणने एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषीपंप स्थापित करण्याचा उच्चांक गाठला. या विक्रमाची गिनिज बुकमध्ये यशस्वी नोंद झाली. गिनीज बुकतर्फे विश्वविक्रम प्रमाणपत्र प्रदान सोहळा आज छत्रपती संभाजीनगरच्या शेंद्रा एमआयडीसीमध्ये ऑरिक सिटी मैदानावर पार पडला. या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती. या विश्वविक्रमाची घोषणा करण्यासाठी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सचे कार्ल सॅविले हे ही यावेळी उपस्थित होते.

या सोहळ्यास राज्याचे अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, विधान परिषद सदस्य आ. संजय केणेकर, आ. अनुराधा चव्हाण, आ. नारायण कुचे,आ. प्रशांत बंब,आ. सुरेश धस, मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार तथा मित्राचे संचालक प्रवीण परदेशी, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, सहसचिव (ऊर्जा) नारायण कराड, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, संचालक सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), योगेश गडकरी (वाणिज्य), राजेंद्र पवार (मानव संसाधन), कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता पवनकुमार कछोट तसेच अभिनेते संदीप पाठक, योगेश शिरसाट आदी मान्यवर उपस्थित होते.

**पंच कार्ल सॅविले यांनी केली विक्रमाची घोषणा**

सुरुवातीला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्यातील सौरकृषी पंपाचे डिजिटल लोकार्पण करुन त्यांनी लाभार्थी शेतकऱ्यांशी दूरदृश्य प्रणालीने संवाद साधला. त्यानंतर गिनीज बुकचे निरीक्षक पंच कार्ल सॅविले यांनी विक्रमाची घोषणा केली. त्यानंतर त्यांनी प्रमाणपत्र व मेडल मान्यवरांना प्रदान केले. सौर कृषी पंप योजनेसाठी अर्थसहाय्य करणाऱ्या एआयआयबी बँकेसोबतच्या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. बँकेचे प्रत्युष मिश्रा व महावितरणच्या अधिकाऱ्यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

कार्ल सॅविले म्हणाले की, विक्रमासाठी ३५ हजार पंप स्थापित करणे आवश्यक होते मात्र प्रत्यक्षात ४५ हजार ९११ पंप स्थापित करण्यात आले, हा एक विश्वविक्रम आहे. या प्रत्येक पंपाच्या उभारणी ते कार्यान्वयन या सर्वटप्प्यांवर पडताळणी करुनच या विक्रमास मान्यता देण्यात आली आहे असे त्यांनी सांगितले.

**महाराष्ट्र थांबणार नाही**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात सुरुवातीला शासनाच्या वर्षपूर्तीनिमित्त राज्यातील जनतेचे आभार व्यक्त केले. हे जनतेला समर्पित वर्ष होते. सगळ्यांच्या जीवनात मूलभूत परिवर्तनसाठी योजना आणल्या त्या कार्यान्वित केल्या. महाराष्ट्र थांबणार नाही, असाच पुढे जात राहील, हा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**सौरपंप स्थापित करण्याच्या क्षमतेत वाढ**

श्री. फडणवीस म्हणाले की, प्रखर दुष्काळाचा सामना करतांना नेहमीच पाण्याची आणि विजेची अडचण होती. जलयुक्त शिवार योजनेमुळे पाण्याची उपलब्धता करतांना विजेच्या समस्येमुळे शेतकऱ्यांना सिंचन करण्यात अडचण होती. दिवसा वीज मिळावी ही प्रमुख मागणी होती. रात्री अपरात्री शेतावर जाण्यात विषारी जीवजंतू, जनावरांची भीती होती. त्यासाठी शासनाने शेतकऱ्यांचे फिडर हे सौर ऊर्जे वर नेण्याचे धोरण निश्‍चित केले. त्यातून एक लाख सोलर पंप ची योजना आखण्यात आली. ही योजना इतकी चांगली होती की, आपल्या राज्यातील ही योजना ही अन्य राज्यांनी जशीच्या तशी राबवावी,असे पत्र केंद्रांमार्फत इतर राज्यांना पाठविण्यात आले. त्यानुसार 'कुसूम' ही केंद्राची योजना तयार झाली. याच योजनेअंतर्गत आज देशात सर्वाधिक ७ लाख पंप राज्याने बसविले आहेत. शेतकऱ्यांनी मागणी केल्यापासून ते पंप बसविण्याच्या क्षमतेत वाढ कऊन आपण प्रतिक्षा कालावधीत कमी केला. महावितरणचे कर्मचारी, अधिकारी, सगळ्या पुरवठादारांचे कर्मचारी, तंत्रज्ञ यांच्या मेहनतीमुळे आज आपण हा विश्वविक्रम करु शकलो. आता हा आपला विक्रम आपणच मोडू,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पुढच्या वर्षभरात सौर कृषी पंपांची संख्या १० लाख झाली पाहिजे,असेही त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना सांगितले.

**सौर ऊर्जेद्वारे १६ हजार मेगावॅट वीज निर्मितीची क्षमता**

श्री. फडणवीस म्हणाले की, अशा प्रकारे सौर ऊर्जेचा वापर वाढवून आपण शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र १६ हजार मेगा वॅट वीज निर्मिती करु शकतो. शिवाय ही वीज निर्मिती कोणत्याही प्रदुषणाशिवाय असेल. तिचा निर्मिती खर्च कमी असल्याने इतर क्षेत्राला लागणारी वीज मुबलक आणि स्वस्तात उपलब्ध होईल. त्यामुळे दरवर्षी ३ टक्क्यांनी आपण विजेचे दर कमी करु, असेही त्यांनी यावेळी घोषीत केले.

**ऊर्जाक्षेत्राला नवी दिशा**

श्री. फडणवीस यांनी पुढे सांगितले की, सौर ऊर्जेचा वापर वाढल्यामुळे सौर ऊर्जा उपकरण निर्मिती कंपन्या, वेंडर्स, कामगार, देखभाल करणारे अशा १ लाख लोकांना रोजगार मिळाला. त्यामुळे ऊर्जाक्षेत्राला नवी दिशा देणारी ही योजना आहे,असे त्यांनी सांगितले.

**मराठवाड्याचा वाटा मोठा**

मराठवाड्याचे कौतुक करतांना श्री. फडणवीस म्हणाले की, या योजनेच्या अंमलबजावणीत मराठवाड्याने आघाडी घेतली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १४ हजार पंप लावण्यात आले. शेतकऱ्यांना नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी योजनेमार्फत अन्य लाभ, बाजाराची उपलब्धता देऊन शेती शाश्वत कशी होईल, यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. नदी जोड सारख्या प्रकल्पांच्या माध्यमातून वाहून जाणारे पूराचे पाणी मराठवाड्यात , विदर्भात व उत्तर महाराष्ट्रात नेऊन दुष्काळ मुक्ती करायची आहे. यासर्व उपाययोजनांमुळे शेती समृद्ध आणि शाश्वत होईल. आमचे सरकार हे शेतकऱ्यांप्रती समर्पित सरकार असून शेती शाश्वत होईपर्यंत आम्ही प्रयत्न करीत राहू, असा शब्द त्यांनी यावेळी उपस्थितांना दिला.

राज्यमंत्री मेघना बोर्डीकर व मंत्री अतुल सावे यांनीही यावेळी उपस्थितांशी संवाद साधून सौर कृषी पंप योजनेमुळे शेती क्षेत्रात आणि अर्थकारणात मोठे बदल होतील,असा विश्वास व्यक्त केला. या ठिकाणी लावलेल्या सौर ऊर्जा उत्पादनांच्या प्रदर्शनालाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी भेट दिली व पाहणी केली.

प्रास्ताविक लोकेश चंद्र यांनी केले.

# दुसऱ्यांशी चांगले वागूनही लोक आपल्याशी वाईट का वागतात? जाणून घ्या कारणे...

आपण चांगले तर जग चांगले, ही थोरामोठ्यांची शिकवण आपण अंमलात आणतो. परंतु बरेचदा अनुभव असा येतो, की कितीही चांगले वागा, पण लोक आपल्याशी वाईटच वागतात. असे का? हा प्रश्न आपल्याला पडतो आणि चांगुलपणावरून आपला विश्वास उडायला लागतो. त्यावर उत्तर दिले एका साधूम हाराजांनी!

एका गावातला एक तरुण अतिशय साधा, भोळा आणि प्रेमळ होता. कोणी कसेही वागो, पण त्याने आपला चांगुलपणा कधीच सोडला नव्हता. परंतु एक वेळ अशी येते, जेव्हा संयमाचा बांध फुटतो आणि आपल्याला स्वत:च्या चांगुलपणाचाही राग येऊ लागतो. मन व्यवहारी होते, स्वार्थी होते, परंतु हा बदलही आपल्याला सहन होत नाही. कारण चांगले वागणे हा आपला स्थायी भाव असतो.

त्या तरुणाच्या बाबतीतही तेच झाले. तो अतिशय अस्वस्थ होता. त्याने गावातल्या एका साधूबाबांकडे जाऊन शंकेचे सम ाधान विचारले. साधू महाराजांनी त्याला आपल्या सदऱ्याच्या खिशातून एक अंगठी दिली आणि म्हणाले, 'पुढचा आठवडाभर ही अंगठी तू तुझ्याजवळ ये आणि त्याची किंमत किती मिळू शकेल याचा शोध घे. फक्त काही केल्या ही अंगठी विकू नकोस!'

प्रश्न आणि उत्तर यांचा परस्पर काहीही संबंध नसताना साधूमहाराजांनी दिलेले काम पाहून तरुण निराश झाला. परंतु त्याने दिलेले काम पूर्ण करायचे ठरवले. तो एका व्यापाऱ्याजवळ गेला. त्याला अंगठी दाखवली. तो त्या अंगठीचे हजार रुपये देईन म्हणाला. तरुण मुलगा दुसऱ्या व्यापाऱ्याकडे गेला, त्या व्यापाऱ्याने दहा हजाराची बोली लावली. तिथून तो एका सोनाराकडे गेला. सोनाराने अंगठी नीट पाहिली आणि म्हणाला एक लाख रुपए देतो, पण ही अंगठी मलाच विक! तरुण मुलगा गोंधळला. तिथून तो एका जवाहिराकडे गेला. त्याने मोल ठरवायला वेळ लावला पण त्याने जे उत्तर दिले ते ऐकून तरुण मुलगा चक्रावला. जवाहीर म्हणाला, माझी सगळी संपत्ती देऊ केली तरी या अंगठीचे म ोल मला फेडता येणार नाही, हे ऐकून गोंधळलेला तरुण साधूम हाराजांकडे परत आला. त्याने सगळी हकीकत सांगितली. त्यावर साधूमहाराज म्हणाले, बाळा, अंगठीची किंमत ज्याने त्याने आपल्या कुवतीनुसार सांगितली. जो खरा रत्नपारखी होता त्याने ही अंगठी अमुल्य आहे असे सांगितले. याचाच अर्थ आपले गुण ओळखणारा आणि त्या गुणांची कदर करणारासुद्धा तेवढाच गुणवान असावा लागतो. जे लोक तुझी किंमत करत नाहीत, ते त्यांच्या कुवतीप्रमाणे तुझ्याशी व्यवहार करतात. मात्र जे तुला ओळखतात ते तुझी किंमत, योग्यता समजतात. तू ही अंगठी आहेस हे आधी ओळख आणि तुझी किंमत सामान्य व्यापाऱ्याने ओळखावी अशी अपेक्षा करू नकोस. तू तुझा चांगुलपणा कायम ठेव. कोणीतरी रत्नपारखी आयुष्यात नक्कीच भेटेल.

**एक गोष्ट सदैव लक्षात ठेवा कि...**

रिकाम्या भांड्यावर झाकण आणि चुकीच्या विचारांची पाठराखण काही उपयोगाची नसते...तुम्ही चांगले आहात की वाईट हा विचार कधीच करू नका, कारण लोकांना गरज पडली की तुम्ही चांगले आणि गरज संपली की वाईट. आपण पायाने चालतो तेव्हा तो प्रवास होतो हृदयाने चालतो तेव्हा ती यात्रा होते आणि भान हरपून चालतो तेव्हा ती वारी होते...माणूस एक अजब रसायन आहे, आवडला तर त्याचे दोष दिसत नाहीत... आणि नाही आवडला तर त्याचे चांगले गुण पण दिसत नाहीत...

नेहमी मन निर्मळ ठेवा व प्रामाणिक राहा...कुणी कितीही फसवले तरी एक लक्षात ठेवा प्रामाणिक माणसाच्या पाठीशी नेहमी सत्य उभ असतं...!

# हिवाळ्यात उकडून खा शेंगदाणे, सांधेदुखीपासून ते हिमोग्लोबिन वाढवण्यापर्यंत मिळतील फायदेच-फायदे



जवळजवळ सर्वांनाच शेंगदाणे खायला आवडतात. शेंगदाणे खाण्याचा एक वेगळाच आनंद असतो. तुम्ही भाजलेले किंवा तळलेले शेंगदाणे नक्कीच खाल्ले असतील. पण, तुम्ही कधी उकडलेले शेंगदाणे खाल्ले आहेत का?

उकडलेले शेंगदाणे खाण्यास चविष्ट तर असतातच, पण आरोग्यासाठीही फायदेशीर असतात. त्यात प्रथिने, नैसर्गिक साखर, लोह, फोलेट, कॅल्शियम आणि जस्त सारखे पोषक घटक असतात. अमेरिकन केमिकल सोसायटीच्या संशोधनानुसार, शेंगदाणे उकळून खाल्ल्याने त्यामध्ये असलेल्या पोषक तत्वांचे फायदे चार पटीने वाढतात.

तुम्ही उकडलेले शेंगदाणे नाश्त्यात खाऊ शकता किंवा जेवणात खाऊ शकता. उकडलेले शेंगदाणे खाल्ल्याने अनेक आरोग्य फायदे होतात. यामुळे शरीराला पोषक तत्वांचा पुरवठा होतो आणि ऊर्जा मिळते. चला जाणून घेऊया उकडलेले शेंगदाणे खाण्याचे फायदे काय आहेत..

पुढील आठवड्यात चार दिवस बँका बंद राहणार, जाणून घ्या

**हिमोग्लोबिन वाढण्यास मदत-**

उकडलेले शेंगदाणे खाल्ल्याने अशक्तपणाची समस्या दूर होते. खरंतर, शेंगदाण्यामध्ये भरपूर लोह असते, जे शरीरातील हिमोग्लोबिनची पातळी वाढवते. उकडलेले शेंगदाणे खाल्ल्याने शरीरात रक्ताची कमतरता होत नाही. यासोबतच शेंगदाण्यामध्ये असलेले पोषक तत्व शरीराला ऊर्जा प्रदान करतात. यामुळे व्यक्ती दिवसभर उत्साही राहते.

**दृष्टी सुधारते-**

उकडलेले शेंगदाणे खाणे आपल्या डोळ्यांसाठी देखील फायदेशीर आहे. उकडलेले शेंगदाणे खाल्ल्याने दृष्टी सुधारते. खरं तर, शेंगदाण्यामध्ये व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन बी ६ असते, जे डोळ्यांच्या आरोग्यासाठी आवश्यक असतात. हिवाळ्यात सकाळी उकडलेले शेंगदाणे खा, यामुळे तुमचे डोळे निरोगी राहतील.

**सांधेदुखीपासून आराम-**

उकडलेले शेंगदाणे गुळासोबत खाल्ल्याने सांधेदुखीपासून आराम मिळतो. शेंगदाणे आणि गुळामध्ये कॅल्शियम असते, ज्यामुळे हाडे मजबूत होतात. उकडलेले शेंगदाणे खाल्ल्याने सांधे आणि हाडांच्या दुखण्याची समस्या दूर होते. संधिवाताच्या रुग्णांसाठी उकडलेले शेंगदाणे खाणे खूप फायदेशीर आहे.

वजन कमी करण्यास उपयुक्त-

उकडलेले शेंगदाणे खाल्ल्याने वजन कमी होण्यास मदत होते. जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर तुम्ही उकडलेले शेंगदाणे खाऊ शकता. खरंतर, उकडलेल्या शेंगदाण्यांमध्ये फायबर मोठ्या प्रमाणात असते. यामुळे चयापचय वाढतो आणि शरीरात साठलेली अतिरिक्त चरबी कमी होते. यासोबतच उकडलेले शेंगदाणे खाल्ल्याने आतडे स्वच्छ होतात.

## दुसऱ्यांचे उपकार विसरू नका



इसापनीतीतील एक छान गोष्ट आहे. एकदा एका जंगलामध्ये एक लांडगा राहत होता. तो अत्यंत खादाड आणि दुष्ट होता. त्याला एकदा खूप जोऱ्याची भूक लागली, त्याने जंगलातले अनेक प्राणी मारून खाल्ले. पण इथेच तो अडकला. एका प्राण्याला मारल्यानंतर त्याला खाताना त्याच्या घशात त्या प्राण्याचे हाड अडकले.

त्याने ते हाड काढायचा खूप प्रयत्न केला, परंतु त्याला यश मिळाले नाही. त्याच्या त्या प्रयत्नांनंतर त्याला खूप त्रास सुरू झाला. त्याला नेमके काय करावे हेच समजत नव्हते. त्याने सुरुवातीला भुरपुर पाणी पिले, परंतु त्याला यश मिळाले नाही. मग त्याने आपल्या इतर मित्रांना आपल्या घशातले हाड काढण्यास सांगितले. परंतु त्याच्या साऱ्या मित्रांनी त्याच्याकडे पाठ फिरवली. शेवटी त्याला त्याच्या डोक्यावरून एक बगळा उडत जाताना दिसला. त्याने त्या बगळ्याला आपली व्यथा सांगितली. तो म्हणाला बगळ्या तू तुझ्या त्या लांब चोचीने जर माझ्या घशात अडकलेले हे हाड काढलेस तर मी तुला बक्षीस देईन, तुझे ते उपकार मी कधीही विसरणार नाही.

बगळ्याला त्याची दया आली. त्याने लांडग्याला मदत करण्याचे ठरवले. तो त्या लांडग्या जवळ आला आणि त्याने त्या लांडग्याच्या घशात आपली चोच घालून आपल्या चोचीने ते अडकलेले हाड काढले. यानंतर त्या बगळ्याने त्याला आपले बक्षीस मागितले, परंतु त्या धूर्त लांडग्याने त्या बगळ्याला चकमा देत तो तेथून फरार झाला. यानंतर काही दिवसांनंतर पुन्हा एकदा त्या लांडग्याच्या घशात हाडाचा एक तुकडा अडकला, त्याला पुन्हा बगळा दिसला, परंतु बगळ्याने यावेळेस त्याला मुळीच मदत केली नाही कारण यापूर्वी त्याच्यावर केलेल्या उपकारांना तो लांडगा विसरला होता. म्हणून लक्षात ठेवा कधीही दुसऱ्यांनी केलेल्या उपकारांना विसरू नका.

## थंडीत डोळ्यांची काळजी घ्या...



ठाणे : थंडी वाढणार असल्याचे संकेत हवामान खात्याने दिले असून या काळात शरीरासोबतच डोळ्यांचीही विशेष काळजी घेणे अत्यावश्यक आहे, असा सल्ला नेत्रतज्ज्ञांनी दिला आहे. थंड वारे, कोरडी हवा आणि स्क्रीनसमोर वाढलेला वेळ या सगळ्यांचा परिणाम थेट डोळ्यांवर होत असून डोळे कोरडे पडणे, लालसर-पणा, चुरचुरणे आणि दृष्टी धूसर होणे या तक्रारी वाढू शकतात.

हिवाळ्याच्या मोसमात अवकाळी पावसाने हजेरी लावली असल्यामुळे थंडी काहीशी लांबली आहे. मात्र थंडीच्या दिवसात डोळ्यांची काळजी तितकीच महत्त्वाची आहे. या काळात हवेतील आर्द्रता कमी होते. त्यामुळे डोळ्यांचा नैसर्गिक ओलावा कमी होतो. यासाठी घरात ह्यूमिडिफायर वापरणे, पुरेसे पाणी पिणे आणि डॉक्टरांच्या सल्लूयाने आर्टिफिशियल टिअर्स (कृत्रिम अश्रू) वापरण्याचा सल्ला दिला जात आहे.

कोरड्या हवेमुळे डोळ्यांचे आरोग्य बिघडू शकते राजकीय विश्लेषणाची पुस्तके नाशिकच्या वाईन टूर मराठी संस्कृतीवरील माहितीपट महिलांसाठी विशेष उत्पादने ''थकवा आणि झोपेअभावी डोळ्यांत कोरडेपणा येतो. दररोज किमान सात ते आठ तासांची झोप घेतल्यास डोळ्यांना विश्रांती मिळते आणि ते ताजेतवाने राहतात. डोळ्यांत खाज, लालसरपणा, पाणी येणे किंवा दृष्टी धूसर होणे या तक्रारी वाढल्यास स्वउपचार न करता नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.'' - डॉ. शुभांगी अंबाडेकर (नेत्रतज्ज्ञ सिव्हिल रुग्णालय ठाणे)

काय काळजी घ्याल :
बाहेर पडताना डोळ्यांवर थंड वाऱ्याचा आणि धुळीचा थेट परिणाम होतो. त्यामुळे सनग्लासेस किंवा संरक्षणात्मक चष्मा वापरणे आवश्यक आहे. हे डोळ्यांना थंडी, धूळ आणि तीव्र प्रकाशापासून बचाव करत असल्याची माहिती सिव्हिल रुग्णालयाच्या नेत्रतज्ज्ञ डॉ. शुभांगी अंबाडेकर यांनी दिली.गाजर, पालक, बदाम, अक्रोड आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स असलेले पदार्थ डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. व्हिटॅमिन ए, सी आणि ई यांचा पुरवठा केल्यास दृष्टीसंबंधी त्रास कमी होऊ शकतो.

प्रत्येक २० मिनिटांनी २० सेकंद स्क्रीनपासून दूर पाहण्याचा सल्ला दिला जातो. असे केल्यास डोळ्यांवरील ताण कमी होतो.

## थायरॉईडची काळजी घेण्यासाठी



संतुलित आहार (आयोडीन युक्त), नियमित व्यायाम, पुरेसे पाणी पिणे आणि तणाव व्यवस्थापन महत्त्वाचे आहे; हायपोथायरॉईडसाठी औषधोपचार आणि हायपरथायरॉईडसाठी जीवनशैलीत बदल आवश्यक असू शकतात, परंतु डॉक्टरांच्या सल्लूयानेच उपचार घ्यावा, कारण यावर कायमस्वरूपी इलाज नसून आयुष्यभर औषधं घ्यावी लागू शकतात. थायरॉईडची काळजी घेण्यासाठी महत्त्वाचे उपाय संतुलित आहार: **(क्रमशः पुढील उद्याच्या अंकात)**

## उपदेशकथा: कथा एका संघर्षमय व्यक्तीची

भारतीय चित्रपट उद्योगाचा पाया घालणारे निर्माते, दिग्दर्शक दादासाहेब फाळके यांनी प्रतिकूल परिस्थितीत अनंत अडचणींना तोंड देऊन राजा हरिश्चंद्र, भस्मासुर-मोहिनी व सत्यवान-सावित्री हे चित्रपट तयार केले. लंडनमध्ये दादासाहेबांचे हे तिन्ही चित्रपट दाखवले गेले. त्यांचे तंत्रकौशल्य पाहून सर्वजण चकीत झाले. ङ्ककायनोटोग्राफफ या नियतकालिकाने लिहिले, ङ्कदादासाहेब इंग्लंडमध्ये जन्माला का आले नाहीत?फ त्यावेळी सुप्रसिद्ध निर्माते सोसिल हेपवर्थ यांनी दादासाहेबांना इंग्लंडमध्ये भारतीय चित्रपट निर्माण करण्याची विनंती केली. भरघोस पगार, स्वातंत्र्य, सन्मान असलेली ऑफर दादासाहेबांनी नमत्रेने नाकारली. त्यांचे आभार मानले व म्हणाले, ङ्कहा व्यवसाय केवळ स्वदेशी व्हावा म्हणून झटलो. भारतीय संस्कृती जगाला ज्ञात व्हावी म्हणून झटलो. भारतीय संस्कृती जगाला ज्ञात व्हावी म्हणून ध्यास घेतला. हा प्रस्ताव स्वीकारला तर माझ्या तत्त्वापासून ढळेन.फ पुढे प्रचंड आर्थिक संकटे झेलून त्यांनी स्वदेशी चित्रपटाचा मार्ग स्वीकारला.**कथा उपदेश : ध्येयनिष्ठ व्यक्तींना लोभ, मोह विचलित करू शकत नाहीत. त्यांच्या अढळ तत्त्वनिष्ठेनेच मोठी कार्ये उभी राहतात.**

## रुपयाची पडझड





यूपीएचे सरकार असताना २०१४ मध्ये डॉलरची किंमत सरासरी ६१ रुपये होती. गेली अकरा वर्षे रुपयाची किंमत सतत घटत आहे. याचा अर्थ अर्थव्यवस्थेत दोष आहे. ते कोण सांगणार व कोण मान्य करणार?

अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयाने नवा नीचांक प्रस्थापित केला आहे. गेले काही महिने रुपयाची घसरण सुरु होतीच; पण आता एका डॉलरला ९० रुपये १९ पैसे हा नवा ऐतिहासिक नीचांक आहे. गेल्या बुधवारी डॉलरच्या तुलनेत रुपया ९०.२९ पर्यंत खाली गेला होता. दिवस अखेर त्यात थोडी सुधारणा होऊन तो ९० रुपये १९ पैसे या पातळीवर बंद झाला. एका वर्षात रुपयाच्या किंमतीत किंवा 'मूल्यात' ५.३ टक्के घट झाली आहे. २०२२ नंतरची ही सर्वात तीव्र घसरण आहे. यामुळे रुपया हे आशियातील सर्वात खराब कामगिरी करणारे चलन ठरले आहे. रुपयाच्या या विक्रमी घसरणीसाठी अर्थतज्ज्ञ वेगवेगळी कारणे देत आहेत. आयात -निर्यातीतील वाढती तूट, परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारपेठेतून भांडवल काढून घेणे ही दोन प्रमुख कारणे पुढे केली जात आहेत. आयात-निर्यातीतील तूट, ज्यास चालू खात्यावरील तूट म्हटले जाते, ती या वर्षी ऑक्टोबरमध्ये 'जीडीपी'च्या १.३ टक्के होती. गेल्या वर्षाच्या जून-सप्टेंबर या तिमाहीच्या तुलनेत ती कमी दिसली तरी प्रत्यक्षात ती ४ कोटी १७ लाख डॉलर्स होती. ही आतापर्यंतची सर्वात जास्त तूट आहे. याचा अर्थ रुपया कमकुवत होऊनही निर्यात कमी होत आहे आणि आयात वाढत आहे. मोदी सरकारकडे यावर उपाय आहे का?

महागाईची नांदी

परकीय संस्थात्मक गुंतवणूकदार या वर्षी भारतीय भांडवल बाजारातून पैसे काढून घेत आहेत. डिसेंबरच्या पहिल्या तीन दिवसांत परकीय गुंतवणूकदारांनी ९३ कोटी ३० लाख डॉलर्स काढून घेतले. संपूर्ण नोव्हेंबर महिन्यात त्यांनी ४२ कोटी ५० लाख डॉलर्स काढून घेतले होते, त्याच्या दुप्पट भांडवल तीन दिवसांत त्यांनी काढून घेतले. चालू वर्षात परकीय गुंतवणूकदारांनी १७ अब्ज ३८ कोटी डॉलर्स काढून घेतले. भारतीय कंपन्यांच्या समभागांचे (शेअर्स) भाव बरेच चढे आहेत, त्या तुलनेत परतावा कमी मिळत आहे हे परकीय गुंतवणूकदारांनी शेअर किंवा भांडवली बाजारातून माघार घेण्याचे एक प्रमुख कारण आहे. अमेरिकेबरोबर व्यापार करार होण्याच्या बाबतीत प्रगती झालेली नाही, हे दुसरे प्रमुख कारण दिले जात आहे. केंद्र सरकार जेवढी दाखवते तेवढी भारतीय अर्थव्यवस्था मजबूत नाही, उत्पादन क्षेत्रातील कंपन्यांचे उत्पन्न व नफा अपेक्षेएवढा नाही. त्यामुळे गुंतवणुकीवर परतावा मिळत नाही, असा निष्कर्ष यावरून काढता येतो. ऑक्टोबरमध्ये ८ गाभा क्षेत्रांच्या विकासदरात वाढ झाली नाही हेही लक्षात घेतले पाहिजे. सरकारचे प्रमुख आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी रुपयाची घसरण हसण्यावारी नेली. त्यामुळे आपली झोप उडालेली नाही असे ते म्हणाले. पुढील वर्षी रुपया पुन्हा मजबूत होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली; त्याचा आधार स्पष्ट नाही. चालू आर्थिक वर्षात परकीय गुंतवणूक १०० अब्ज डॉलर्सचा टप्पा ओलांडेल अशीही आशा त्यांनी व्यक्त केली. गेल्या वर्षी ती ८१ अब्ज डॉलर्स होती. कर्जरोख्यांमध्ये गेल्या तीन दिवसांत ३० कोटी ३ लाख डॉलर्सची परकीय गुंतवणूक झाली. नोव्हेंबरच्या तुलनेत ती बरीच कमी असल्याचे या क्षेत्रातील तज्ज्ञांनी म्हटले आहे. डॉलर महाग झाल्याने देशाच्या अर्थव्यवस्थेचा आकार वाढल्यासारखे दिसेल व सरकार त्याबद्दल आपली पाठ थोपटून घेईल. निर्यातीची रक्कम वाढल्याचे दिसेल; पण प्रत्यक्षात जास्त माल निर्यात झालेला नसेल. रुपया घसरल्याने परदेशात शिक्षण घेणे व परदेशी जाणे महागेल. खनिज तेल, वैद्यकीय उपकरणे यांची आयात महाग होईल. वैद्यकीय सेवेचा महागाई वाढीचा दर सध्या १३ टक्के एवढा उच्च आहे. आता ही सेवा आणखी महाग होऊ शकते. स्वयंपाकाचा गॅस, पेट्रोल, वाहनांचा गॅस, खते, इलेक्ट्रॉनिक वस्तू, भांडवली वस्तू यांच्याही किंमती वाढल्यास सर्वसाधारण महागाईस चालना मिळण्याचा धोका आहे. अर्थातच सामान्य नागरिकांना जास्त कर भरावा लागेल. चलनाचा दर कमी जास्त होणे हे जगभर नेहमी चालू असते; पण रुपयाची ही घसरण नाही तर त्याचे हे 'अवमूल्यन' आहे ही एका तज्ज्ञाची प्रतिक्रिया बरीच बोलकी आहे.

## डॉक्टर टीप्स

### बुद्धी तल्लख होण्यासाठी आपल्या आहारात करा हे पदार्थ समाविष्ट



याप्रमाणे शरीरातील इतर अवयवांना अन्नातील पोषक घटकांची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे पोषक घटकांची आवश्यकता आपल्या मेंदूलाही असते. शरीरातील सर्व प्रमुख क्रिया नियंत्रित करणारा असा हा अवयव असल्याने याचे आरोग्यही महात्वाचे आहे. एखाद्या खाद्यपदार्थाची निवड करताना आपण त्याचे रंग, रूप, सुगंध, आणि अर्थातच चव या गोष्टी प्रामुख्याने लक्षात घेत असतो. आजकालच्या फिटनेसच्या बाबतीत जास्त जागरूक असलेली मंडळी पदार्थांची निवड करताना त्यामध्ये किती कॅलरीज आहेत याचे ही गणित सातत्याने मांडत असतात. मात्र केवळ चव चांगली नाही किंवा कॅलरीज अधिक आहेत म्हणून आवर्जून टाळल्या जाणाऱ्या पदार्थांपैकी अनेक पदार्थ मेंदूच्या आरोग्याला पूरक असून, बुद्धीवर्धक आहेत. **(क्रमशः)**

## विनोद




'तसे म्हटले तर आपली मुलगी लहानच आहे लग्नासाठी! थोडी वाट पाहिली तर एखादा हुशार नि चुणचुणीत तरुण मिळेल तिला.' 'इश्श! आता कशाला वाट पहाता? लहान आहे तंवरच तिचे लग्न करून टाकायचे. तसे म्हटले तर मी थोडीच वाट पाहिली.'

## संदेश

girna bhi acha h aukat
ka pta chalta h.
jab hath uthane apno ka
pta chalta h.
sikh rha ho mai insan
ko padhne ka honar.
suna h chahery par
kitabo se ziyada likha
hota hai.

## सुविचार



ते सोपे आहे माझ्या मित्रा: कारण राजकारण हे भौतिकशास्त्रापेक्षा अवघड आहे.

**- अल्बर्ट आइनस्टाइन**

**संस्कृत सुभाषित**

कल्पतरू खाली । फळे येती मागितली
तेथे बैसल्याचा भाव । विचारूनी बोले ठाव ।
द्यावे ते उत्तर । येतो प्रति त्याचा फेर
तुका म्हणजे मनी । आपुल्याच लाभ हानी ।

संस्कृत सुभाषित

खल: कापट्या दोषेन दूरेणैव विसृज्यते । अपाय रांकिमिलौके विषेणाशी विषो यथा ।

## मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. पूर्वी गाणीबातम्या ऐकण्यासाठी याचा वापर करीत
४. पराक्रमी
७. रामदासांचे प्रसिद्ध काव्य
११. खलाशी
१२. कर्णभूषण
१४. गोष्ट
१५. केविलवाणा
१६. पुसट, धूसर
१७. असत्य
१९. सुगरण पक्ष्याचे घरटे
२२. भांडण
२३. मर्यादा, अंत
२५. वाडवडिलांनी कमावलेले
२६. तल्लीन
२७. मैत्रीण
२८. पार्वती
२९. किल्ला
३०. उलट, प्रतिकूल
३४. धनको
३६. मालिका, हार
३७. हनुमान
३८. समशेर
४०. काकुनी
४२. अफवा
४३. हुलगे
४५. सहाय्य
४६. विविध प्रकारचे
४७. लहान
५०. पाण्याचा नळ
५१. वायू
५३. सभा
५४. कोरडे, वैराण
५५. लेखणी
५७. आवड
५९. पाषाण
६१. दारूचा एक प्रकार
६२. वि.वा. शिरवाडकरांचे हे नाटक विशेष लोकप्रिय आहे
६४. चिंतन
६६. लक्ष्मी
६७. विषयांध
७२. धूळ, केर
७४. श्रावणात अनेकजण याची पूजा करतात
७७. सत्यवानाची बायको
७९. गुलामी
८०. कमी दर्जाचे
८१. नेमस्त

### उभे शब्द

१. वाळू
२. शिजवलेला भात
३. भूमी
५. हसण्याजोगे, पोरकट
६. रुदन
८. स्त्री
९. धार्मिक काव्याचा एक प्रकार
१०. कथालेखक
१२अ. पाकिट
१५. दिवाळी
१८. झाडापासून मिळणारे आरोग्यवर्धक शीतपेय
२०. गोफण, बेचकी
२१. कमावलेले (धन)
२२. घट्ट
२३. आंब्याची एक जात
२४. पंढरीची पायी यात्रा
२६. रामायणातील प्रसिद्ध अरण्य
२७. बेचव
२८. एक लोकप्रिय वाङ्मायप्रकार
२९. तृण
३१. कामकुचार, सुस्त
३२. अंगठ्यापासून सर्वात दूरचे बोट
३३. गगन
३५. जाडसर दळलेला गहू
३६. पीछेहाट
३९. मार्गस्थ
४०. ही साखर गुलकंदात वापरतात
४१. नवरा
४३. कपटी
४४. पक्ष्यांचा समूह
४६. आवाज
४८. मऊ
४९. पूर्वज
५०. अपुरा
५२. कोल्ह्यासारखा पशू
५३. नमस्कार
५६. यथेच्छ
५८. सार्वभौम राजा
६०. चांगले
६३. एकाग्र दृष्टी
६५. भ्रतार
६७. छळ, त्रास
६८. खरेपणा
६९. रानात पसरलेली आग
७०. मत्स्य
७१. कागदकापड कापण्याचे साधन
७२. केव्हा
७३. बेकरी मालासाठी आवश्यक पदार्थ
७५. रोटीचा एक प्रकार
७६. प्राण नेणारा देव
७८. तांबूल

### आडवे उत्तर

१.रेडियो ४.बहादूर ७.मनाचे ेक ११.दर्यावर्दी १२.डूल १४.कथा १५.दीन १६.अस्पष्ट १७.खोटे १९.खोपा २२.तंटा २३.परावार २५.वडिलोपार्जित २६.दंग २७.सय २८.काली २९.गड ३०.विपरीत ३४.सावकार ३६.माळ ३७.बजरंगबली ३८.तरवार ४०.खर्डेघाशी ४२.वावडी ४३.कुळीथ ४५.मदत ४६.नाना ४७.सान ५०.तोटी ५१.वात ५३.सद ५४.रखरखीत ५५.कलम ५७.रस ५९.शिला ६१.रम ६२.नटसम्राट ६४.मनन ६६.श्री ६७.कामुक ७२.कचरा ७४.सत्यनारायण ७७.सावित्री ७९.दास्य ८०.हीन ८१.मवाळ

### उभे उत्तर

१.रेती २.ओदन ३.अवनी ५.हास्यास्पद ६.रडू ८.नारी ९.ेक १०.कथाकार १२अ.लखोटा १५.दीपावली १८.नीरा २०.गलोल २१.अर्जित २२.तंग २३.पायरी २४.वारी २६.दंडकारण्य २७.सपक २८.कादंबरी २९.गवत ३१.आळशी ३२.करंगळी ३३.अंबर ३५.रवा ३६.माघार ३९.रवाना ४०.खडीसाखर ४१.दादला ४३.कुटील ४४.थवा ४६.नाद ४८.नरम ४९.पितर ५०.तोकडा ५२.तरस ५३.सलाम ५६.मनमुराद ५८.सम्राट ६०.छान ६३.टक ६५.नवरा ६७.काच ६८.प्रत्यही ६९.वणवा ७०.मासा ७१.कात्री ७२.कधी ७३.मैदा ७५.नान ७६.यम ७८.विडा



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### शुभमन गिल टी२० सीरिज खेळणार का नाही? बीसीसीआय ने दिली मोठी अपडेट



मुंबई-भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या ५ टी-२० मॅचच्या सीरिजला मंगळवार ९ डिसेंबरपासून सुरूवात होणार आहे. या सीरिजमध्ये टी-२० टीमचा उपकर्णधार शुभमन गिल खेळणार का नाही? याबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. टी-२० टीममध्ये गिलची निवड करण्यात आली होती, तरीही मेडिकल टीमने गिलला फिटनेसचे सर्टिफिकेट दिले तरच तो टी-२० सीरिजमध्ये सहभागी होईल, असे बीसीसीआयने स्पष्ट केले होते. यानंतर आता बीसीसीआयने गिलच्या फिटनेसबद्दल महत्त्वाची अपडेट दिली आहे.शुभमन गिलला बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्सकडून मैदानात उतरण्याची परवानगी मिळाली आहे. गिलला दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या टेस्ट मॅचवेळी मानेला दुखापत झाली होती.

### 'बॉल टाक जा...', डीआरएसची भीक मागत बसला, पण कुणीच ऐकले नाही, शेवटी रोहित बोलल्यावर सगळेच हसले



विशाखापट्टणम-विशाखापट्टणमध्ये भारत आणि साऊथ आफ्रिका यांच्यात सूरू असलेला तिसरा वनडे सामना हा रोमांचक स्थितीत पोहोचला आहे. या सामन्यात एक मजेशीर घटना घडली आहे.टीम इंडियाचा चायनामॅच कुलदीप यादवने डिआरएसची मगणी केली होती.पण कॅप्टन राहुलने त्याचे काहीच ऐकले नाही. त्यानंतर ज्यावेळेस रोहितकडे मागणी केली तेव्हा त्याने 'जा बॉल टाक जा' असा सल्ला दिला.त्यामुळे ही घटना पाहून अनेकांना हसू आवरत नाही आहे.खरे ही घटना ४३ व्या ओव्हर दरम्यान घडली आहे. कुलदीप यादवने या ओव्हरच्या दुसऱ्याच बॉलवर कॉर्बिन बॉशला कॉट अँड बोल्ड केले होते.त्यानंतर याच ओव्हरच्या पाचव्या बॉलवर त्याने लुंगी एनगिडीला एलबीडब्ल्यू करण्याचा प्रयत्न केला.

### ''तो नेहमी माझी'', रोहितबरोबर रिव्ह्यूवरून मैदानावर नेमके काय झाले?



६ डिसेंबर-भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील अखेरच्या वनडे सामन्यात कुलदीप यादवने शानदार गोलंदाजी केली. रोहित शर्मा व कुलदीप यादव यांच्यात रिव्ह्यूवरून चर्चेचा व्हायरल व्हीडिओ पाहायला मिळाला. कुलदीप यादव गोलंदाजी करताना अनेकदा रिव्ह्यू घेण्यासाठी कर्णधारावर दबाव टाकत असतो. असंच काहीसं कुलदीप यादवने तिसऱ्या वनडेत केलं. ज्यावर रोहितने दिलेल्या भन्नाट प्रतिक्रियेचा व्हीडिओ व्हायरल होत आहे. याबाबत कुलदीप यादवने इनिंग्स ब्रेकमध्ये वक्तव्य केलं आहे. कुलदीप यादवने या सामन्यात १० षटकांत ४ विकेट्स घेत उत्कृष्ट कामगिरी केली. कुलदीप यादव केएल राहुलवर रिव्ह्यू घेण्यासाठी दबाव टाकत होता.

### गाबा कसोटीत ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात ५०० पार धावा; एकाही फलंदाजाने झळकावले नाही शतक

ब्रिस्बेन-प्रतिष्ठित ॲशेस मालिकेतील दुसरा कसोटी सामना ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड क्रिकेट संघात ब्रिस्बेनमधील द गाबा स्टेडियमवर खेळला जात आहे. इंग्लंडच्या पहिल्या डावातील ३३४ धावांच्या प्रत्युत्तरात, ऑस्ट्रेलियाने ५०० पेक्षा जास्त धावा करुन सामन्यावर मजबूत पकड निर्माण केली आहे. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी, ऑस्ट्रेलियन संघ ११७.३ षटकांत ५११ धावांवर सर्वबाद झाला, ज्यामुळे संघाला इंग्लंडवर १७७ धावांची आघाडी मिळाली.
गॅबा कसोटीत ऑस्ट्रेलियाची आघाडी : ऑस्ट्रेलियानं तिसऱ्या दिवसाच्या खेळाची सुरुवात ३७८६ या धावसंख्येने केली. पहिल्या सत्रात कांगारुंना धक्का बसला, परंतु मिचेल स्टार्कनं डाव सावरला.

# क्विंटन डी कॉकचे विक्रमी शतक!

## विराटच्या प्रतिक्रियेने वेधले लक्ष □ भारताविरुद्ध अशी कामगिरी करणारा पहिला फलंदाज





विशाखापट्टणम-भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तिसरा आणि निर्णायक वनडे सामना रायपूरमध्ये खेळवला जात आहे. या सामन्यात क्विंटन डिकॉकने शानदार शतक झळकावलं आहे. पहिल्या दोन्ही वनडे सामन्यांमध्ये अपयशी ठरल्यानंतर डिकॉक तिसऱ्या सामन्यात झळकला आहे. यासह त्याने एक मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे. दक्षिण आफ्रिकेचा स्टार यष्टीरक्षक फलंदाज क्विंटन डी कॉकने निवृत्ती मागे घेत मैदानावर परतल्यानंतर आपला उत्कृष्ट फॉर्म कायम ठेवला आणि एक शानदार शतक झळकावलं. जवळजवळ दोन वर्षे एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेला क्विंटन डी कॉक नोव्हेंबरमध्ये निवृत्तीनंतर परतला आणि पाकिस्तानविरुद्ध सलग तीन सामन्यांमध्ये एक शतक आणि दोन अर्धशतकं झळकावली. पण भारताविरुद्धच्या मालिकेतील पहिल्या दोन सामन्यांमध्ये तो फक्त ८ धावा करू शकला. पण निर्णायक सामन्यात डी कॉकने केवळ ८० चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं.
प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेने पहिल्याच षटकात एक विकेट गमावली, परंतु क्विंटन डी कॉकने आपली स्फोटक फलंदाजी कायम ठेवली. यासह डी कॉकने ८० चेंडूत ८ चौकार व ६ षटकारांसह आपलं शतक पूर्ण केलं. यासह त्याच्या शतकानंतर विराट कोहली टाळ्या वाजवत त्याचं कौतुक करताना दिसला.
क्विंटन डी कॉक हा भारताविरूद्ध वनडेमध्ये अवघ्या २३ डावांमध्ये ७ शतकं करणारा पहिला फलंदाज ठरला. त्याच्याआधी सनथ जयसूर्या यांनीही ७ शतकं केली, पण त्यांनी ८५ डावांमध्ये ही कामगिरी केली होती. याशिवाय डी कॉकने विकेटकिपर फलंदाज म्हणून वनडे क्रिकेटमध्ये सर्वाधिक विक्रमांची बरोबरी केली आहे.

क्विंटन डी कॉक – ७ शतकं, २३ डाव
सनथ जयसूर्या – ७ शतकं, ८५ डाव
एबी डिव्हिलियर्स – ६ शतकं, ३२ डाव
रिकी पॉन्टिंग – ६ शतकं, ५९ डाव
कुमार संगकारा – ६ शतकं, ७१ डाव

विकेटकिपर फलंदाज म्हणून वनडेत सर्वाधिक शतकं
२३ – कुमार संगकारा
२३ – क्विंटन डी कॉक
१९ – शाई होप
१६ – ॲडम गिलख्रिस्ट
११ – जोस बटलर
१० – एबी डिव्हिलियर्स, एमएस धोनी

## पिंक बॉल टेस्टमध्येही इंग्लंडची शरणागती; ऑस्ट्रेलियाचा ८ विकेट्सनी दणदणीत विजय

दिल्ली-ॲशेस मालिकेतल्या पिंक बॉल टेस्टमध्येही वर्चस्व कायम राखत ऑस्ट्रेलियाने दुसरा सामना ८ विकेट्सनी जिंकला. या विजयासह ऑस्ट्रेलियाने पाच सामन्यांच्या मालिकेत २-० अशी दमदार आघाडी घेतली आहे. ८ विकेट्स आणि ७७ धावा करणारा मिचेल स्टार्क ऑस्ट्रेलियाच्या विजयाचा शिल्पकार ठरला.
पहिल्या टेस्टमध्ये शरणागती पत्करल्यानंतर इंग्लंड संघावर जोरदार टीका झाली होती. त्या पराभवातून बोध घेत इंग्लंड खेळ सुधारेल असं वाटलं होतं पण पिंक बॉल टेस्टमध्येही इंग्लंडने सर्वसाधारण खेळ केला.
टॉस जिंकून इंग्लंडने बॅटिंगचा निर्णय घेतला. जो रूटच्या शतकाच्या बळावर इंग्लंडने ३३४ धावांची मजल मारली. रूटने १२ वर्षांनंतर ऑस्ट्रेलियात पहिलंवहिलं शतक झळकावलं. त्याने १५ चौकार आणि एका षटकारासह १३८ धावांची खेळी केली. झॅक क्राऊलेने ७६ धावा करत त्याला चांगली साथ दिली. ऑस्ट्रेलियातर्फे मिचेल स्टार्कने ६ विकेट्स पटकावल्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना ऑस्ट्रेलियाने ५११ धावांचा डोंगर उभारला. जेक वेदराल्ड, मार्नस लबूशेन, स्टीव्हन स्मिथ, अलेक्स कॅरे, मिचेल स्टार्क यांनी अर्धशतकी खेळी केल्या. इंग्लंडतर्फे ब्रायडन कार्सने ४ तर बेन स्टोक्सने ३ विकेट्स घेतल्या. ऑस्ट्रेलियाने १७७ धावांची महत्त्वपूर्ण आघाडी मिळवली.
दुसऱ्या डावातही इंग्लंडची घसरगुंडी सुरूच राहिली. कर्णधार बेन स्टोक्सने ५० तर विल जॅक्सने ४१ धावांची खेळी केली. इंग्लंडचा दुसरा डाव २४१ धावांतच आटोपला आणि ऑस्ट्रेलियाला विजयासाठी ६५ धावांचे लक्ष्य मिळालं. ऑस्ट्रेलियातर्फे मायकेल नेसरने ४२ धावांत ५ विकेट्स घेतल्या. विजयासाठी मिळालेले लक्ष्य ऑस्ट्रेलियाने दोन विकेट्सच्या मोबदल्यात गाठले आणि चौथ्या दिवशीच विजयावर शिक्कामोर्तब केलं.



## वनडे विश्वचषक अजूनही दोन वर्षे दूर, तरुण खेळाडू त्यांची जागा...रोहित-विराटबाबत गंभीरचे मोठे विधान





विशाखापट्टणम-दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत रोहित शर्मा आणि विराट कोहलीने शानदार कामगिरी केली. विराट कोहलीनं दोन शतकं आणि एक अर्धशतक झळकावले, तर रोहित शर्मानंही दोनदा ५० धावांचा टप्पा ओलांडला.
आता असे दिसते की रोहित आणि विराट २०२७ च्या विश्वचषकात नक्कीच खेळताना दिसतील. मात्र, मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर अजूनही त्यांच्या स्थानाबद्दल अनिश्चित आहे, कारण स्पर्धा अद्याप सुमारे दोन वर्षे दूर आहे.
गौतम गंभीरचे एक आश्चर्यकारक विधान : वनडे मालिकेच्या समाप्तीनंतर पत्रकार परिषदेत गौतम गंभीर उपस्थित होता. यादरम्यान त्याला रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या २०२७ च्या विश्वचषकात सहभागाबद्दल विचारण्यात आलं. त्यांच्या भविष्याबद्दल बोलताना, टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक म्हणाला, मफ्फसर्वप्रथम, तुम्हाला हे समजून घ्यावं लागेल की २०२७ चा वनडे विश्वचषक अजूनही दोन वर्षे दूर आहे. सध्या, आपल्याला वर्तमानात राहण्याची आणि हे लक्षात ठेवण्याची गरज आहे की तरुण खेळाडू त्यांची जागा घेण्यासाठी संघात येत आहेत.फ्फ
गंभीरने केले विराट आणि रोहितचे कौतुक : गौतम गंभीरला अद्याप विराट आणि रोहित विश्वचषकात खेळतील याबद्दल आत्मविश्वास नसला तरी, त्याने त्यांच्या कामगिरीचे कौतुक केले. तो म्हणाला, मफ्फविराट कोहली आणि रोहित शर्मा हे जागतिक दर्जाचे खेळाडू आहेत. त्यांचा अनुभव ड्रेसिंग रुमसाठी महत्त्वाचा आहे. ते बऱ्याच काळापासून खेळत आहेत. आशा आहे की, ते असेच करत राहतील, जे निश्चितच वनडे सामन्यांमध्ये संघासाठी फायदेशीर ठरेल.फ्फ
वनडे मालिकेत रोहित आणि विराटची कामगिरी : दक्षिण आफ्रिकेविरुद्धची वनडे मालिका विराट कोहली आणि रोहित शर्मासाठी खूपच प्रभावी ठरली. विराट कोहलीनं तीन सामन्यांमध्ये १५१ च्या सरासरीनं ३०२ धावा केल्या. त्यानं २४ चौकार आणि १२ षटकार मारले. रोहित शर्मानं तीन सामन्यांमध्ये १४६ धावा केल्या, ज्यामध्ये दोन अर्धशतकांचा समावेश आहे. त्याची सरासरी ४८.६७ होती आणि त्याने मालिकेत १५ चौकार आणि सहा षटकार मारले.

## स्मृतीने लग्न मोडल्याची घोषणा करताच, पलाश पोस्ट शेअर करत म्हणाला

दिल्ली-भारताची स्टार फलंदाज स्मृची मानधना आणि पलाश मुच्छल दोघेही विवाह बंधनात अडकणार होते. २३ नोव्हेंबरला सांगलीत दोघांचा विवाह होणार होता. पण विवाह होण्याच्या काही तासांआधीच स्मृतीच्या वडिलांची प्रकृती बिघडली, त्यामुळे विवाह सोहळा अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आला होता. त्यानंतर सोशल मीडियावर दोघांच्या नात्यांवरून बऱ्याच चर्चा रंगल्या. कुटुंबियातील सदस्यांनी या अफवा असल्याची भूमिका घेतली. त्यानंतर गेल्या २ आठवड्यांपासून स्मृती आणि पलाश सोशल मीडियापासून पूर्णपणे दूर होते. अखेर ७ डिसेंबरला स्मृती मानधनाने इंस्टाग्राम अकाऊंटवर पोस्ट शेअर करून हे लग्न मोडलं असल्याची माहिती दिली. दरम्यान स्मृतीने पोस्ट शेअर केल्यानंतर पलाशनेही यावर आपली प्रतिक्रिया दिली आहे.

**स्मृतीने पोस्ट शेअर करत दिली लग्न मोडल्याची माहिती**

स्मृतीने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिने लिहिले आहे की, मफ गेल्या काही आठवड्यांपासून माझ्या आयुष्याबाबत बऱ्याच चर्चा रंगल्या आहेत. मला तरी हेच वाटतं की मी यावेळी याबद्दल बोलणं खूप गरजेचं आहे. मी अतिशय खाजगी व्यक्ती आहे. परंतु मला एक गोष्ट स्पष्ट करायची आहे की, माझं लग्न रद्द करण्यात आलं आहे.फ्फ
तसेच तिने आपल्या पोस्टमध्ये पुढे लिहिले की, मफ्हे प्रकरण मला इथेच संपवायचं आहे. मला तुम्हालाही विनंती करायची आहे की, यावेळी दोन्ही कुटुंबांच्या गोपनियतेचा आदर करा. आम्हाला यातून बाहेर पडण्यासाठी वेळ द्या. सर्वांसमोर काही ना काही उद्दिष्ट असतं आणि माझ्यासमोर हेच उद्दिष्ट आहे की, मी सर्वोच्च स्तरावर देशाचं प्रतिनिधित्व करावं. माझं हेच ध्येय आहे की, मी देशासाठी खेळत राहावं आणि शक्य तितकी जेतेपद जिंकत राहावं. तुम्ही दिलेल्या पाठिंब्याबद्दल धन्यवाद. इथून पुढे जाण्याची वेळ आली आहे.

**पलाश मुच्छल काय म्हणाला?**

यावर पलाश मुच्छलनेही आपली प्रतिक्रिया दिली आहे. पलाशने देखील पोस्ट शेअर केली आहे. पलाश म्हणाला, मफ्मी माझ्या आयुष्यात पुढे जाण्याचा आणि माझ्या वैयक्तिक नात्यातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. जी गोष्ट माझ्यासाठी खूप जास्त पवित्र होती, त्याबद्दल लोकं इतक्या सहजपणे निराधार अफवांवर प्रतिक्रिया देतात हे पाहणं माझ्यासाठी खूप कठीण आहे. हा माझा आयुष्यातील खूप कठीण टप्पा आहे. मी माझ्या श्रद्धेवर दृढ राहून याचा सामना मोठ्या विनम्रतेने करेन.तसेच त्याने पुढे लिहिले की, मफ्फकुठल्याही गोष्टीचा स्त्रोत माहित नसताना, तपास न केलेल्या अफवांच्या आधारावर कोणावरही बोट दाखवण्यापूर्वी आपण एक समाज म्हणून विचार करायला हवा. आपले शब्द अशा प्रकारे दुखावू शकतात, जे आपण कधीच समजू शकणार नाही. खोट्या आणि बदनामीकारक गोष्टी पसरवणाऱ्यांविरुद्ध माझी टीम कठोर कायदेशीर कारवाई करेल. या कठीण काळात ज्यांनी मला प्रेमळपणे साथ दिली, त्या सर्वांचे मी आभार मानतो.

# अखेर स्मृतीने मौन सोडले, पलाशसोबत लग्न न करण्याचा निर्णय!

मुंबई-टीम इंडियाची स्टार खेळाडू स्मृती मानधना आणि संगीतकार पलाश मुच्छल गेल्या काही दिवसांपासून सातत्याने चर्चेत होते ते त्यांच्या लग्नामुळे. २० नोव्हेंबरला दोघांचा साखरपुडा झाला. त्यानंतर मोठ्या थाटामाटात त्यांच्या लग्नाची तयारी सुरू होती. सगळे समारंभ ही दणक्यात पार पडत होते. दोघांचेही मेहंदी, हळद, संगीत समारंभातील धमाल करतानाचे फोटो व्हिडिओ चाहत्यांनी अक्षरशः उचलून धरले होते. लग्नाच्या आदल्या दिवशी अचानक आनंदावर विरजण पडलं. सगळी परिस्थिती बदलली. स्मृती मंधानाच्या वडिलांची तब्येत बिघडल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. दुसरीकडे पलाश मुच्छलचीही तब्येत बिघडल्याने त्यालाही ॲडमिट करण्यात आले होते. या दोन्ही घडामोडी नंतरच सोशल मीडियावर त्यांच्या लग्नात अडथळे येत असल्याच्या चर्चा सुरू झाल्या. लोकांनी तर्कवितर्क लावायला सुरुवात केली. स्मृतीने ळपींरसीरा पोस्ट डिलीट केल्या. नंतर लग्न पुढे ढकलल्याचा बातमीने सोशल मीडियावर पलाश चे काही चॅट व्हायरल झाले. एका महिलेने हे स्क्रीन शॉट शेअर करत पलाश सोबत झालेली फ्लरिटी चार्ट असल्याचा दावा केल्याने अफवांना उधाण आले. या सगळ्या अफवांना वैतागून आज अखेर स्मृती आणि पलाश दोघांनीही त्यांच्या इंस्टाग्राम स्टोरीतून अधिकृत घोषणा करत लग्न रद्द झाल्याची माहिती दिली आहे. पलाश आणि स्मृतीच्या चाहत्यांना त्यांच्या आयुष्याबद्दल गोपनीयता राखावी असे आवाहन त्यांनी केलेय.

लग्नाच्या आदल्या दिवशी काय घडले ?

स्मृती आणि पलाशच्या लग्नाच्या विधींना धुम धडाक्यात सुरुवात झाली होती. लग्नाच्या आदल्या दिवशीपर्यंत सांगलीत सगळे काही नीट सुरू होतं. पण अचानक स्मृतीच्या वडिलांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यामुळे त्यांना तातडीने रुग्णालयात हलवलं. स्मृतीने कोणताही विचार न करता लग्न पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. दुसऱ्याच दिवशी पलाश मुच्छलही प्रकृती अस्वास्थामुळे रुग्णालयात दाखल झाला. दोन्ही कुटुंबावर आलेल्या या दुहेरी संकटामुळे लग्न स्थगित झालं होतं. याच काळात स्मृतीने आपल्या लग्नाच्या सर्व पोस्ट अगदी प्रपोज केलेला व्हिडिओ सुद्धा डिलीट केला. त्यामुळे चर्चांना अधिक उधाण आले. दोघांमध्ये काही बिनसले आहे का? अशा चर्चा सुरू झाल्या. पण या सगळ्या चर्चांना पूर्णविराम देत कुटुंबीयांनी लग्न मोडले नसून ते काही काळासाठी पुढे ढकळण्यात आल्याचे सांगितले.

चॅट स्क्रीनशॉट व्हायरल

दरम्यान लग्न पुढे ढकल्ल्याच्या बातमीच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर काही चॅट स्क्रीनशॉट व्हायरल झाले होते. एका महिलेने हे स्क्रीन शॉट शेअर केले जात पलाश सोबत झालेली कथेत फ्लर्टींग चॅट असल्याचा दावा करण्यात आला होता. सोशल मीडियावर अनेक स्क्रीनशॉट व्हायरल होऊ लागले ज्यामध्ये पलाशवर मेरिडिकोस या नावाच्या महिलेवर स्मृतीची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही स्क्रीनशॉट किती खरे किंवा खोटे आहेत याची पुष्टी झाली नसली तरी नेटिझन्सकडून पलाशवर टिकेची झोड उठली. सोशल मीडियावर आणखी चर्चा झाली तेव्हा चाहत्यांना स्मृती मानधनहीने आपल्या इंस्टाग्राम वरून हळद, मेहंदी आणि साखरपुडा अशा विवाहांशी संबंधित सर्व पोस्ट हटवल्याचे दिसलं. वातावरण शांत करण्यासाठी आणि अनावश्यक अफवांना आळा घालण्यासाठी तिने ह्या पोस्ट हटवल्याचही बोलले जात होते.





दुसरीकडे पलाशच्या आई लग्न लवकरच होईल असे आश्वासक बोलत होत्या. गेल्या अनेक दिवसांपासून चाहत्यांना पलाश आणि स्मृतीच्या विवाहाची नवी तारीख कधी जाहीर होते याची उत्सुकता लागली होती. मात्र दोघांनीही आज इंस्टाग्राम स्टोरी टाकत लग्न मोडल्याचे अधिकृत घोषणा केली.

आता पुढे जाण्याची वेळ आली आहे

स्मृती मानधनाची पोस्ट,फ्फआपल्या सगळ्यांच्या आयुष्यात काहीतरी मोठे ध्येय असते. माझ्यासाठी ते नेहमीच भारतासाठी सर्वोच्च स्तरावर क्रिकेट खेळणे आणि देशासाठी जास्तीत जास्त विजेतेपदे जिंकणे हेच आहे. पुढेही माझं पूर्ण लक्ष याच गोष्टीवर राहणार आहे. तुमच्या सगळ्यांच्या पाठिंब्याबद्दल धन्यवाद. आता पुढे जाण्याची वेळ आली आहे.

पलाश मुच्छलने सुद्धा लग्न मोडल्याची माहिती दिली

दरम्यान, स्मृतीने इन्स्टा स्टोरीवरून लग्न मोडल्याची माहिती दिल्यानंतर पलाश मुच्छलने सुद्धा इन्स्टा स्टोरी पोस्ट करत लग्न रद्द केल्याची माहिती दिली आहे. पलश मुच्छलने म्हटले आहे की, मी माझ्या आयुष्यात पुढे जाण्याचा आणि माझ्या वैयक्तिक नातेसंबंधातून मागे सरकण्याचा निर्णय घेतला आहे. लोकांनी कोणताही आधार नसलेल्या अफवांवर इतक्या सहज विश्वास ठेवून प्रतिक्रिया देताना पाहणे माझ्यासाठी खूप कठीण होते. माझ्यासाठी खूप महत्त्वाच्या गोष्टींबद्दल या अफवा पसरल्या, आणि हा माझ्या आयुष्यातला फार कठीण काळ आहे, पण मी माझ्या मूल्यांवर ठाम राहून शांतपणे याला सामोरे जाईन.

# महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानवास अभिवादन!

**लातूर/प्रतिनिधी** : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी ६ डिसेंबर रोजी देश-विदेशातून लाखो अनुयायी दरवर्षी चैत्यभूमी, मुंबई येथे बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येत असतात.

मुंबईत येणाऱ्या अनुयायांसाठी महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन गेल्या १५ वर्षांपासून सातत्याने पिण्याचे पाणी व मोफत सुविधा पुरवते. दरवर्षीप्रमाणे यावर्षीहि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन, बॅकवार्ड क्लासेस सिनियर इंजिनीअर्स ऍंड ऑफिसर्स असोसियेशन व स्वतंत्र मजदुर युनियन तर्फे अनुयायांसाठी आरोग्यदायी फेस मास्क, पिण्याचे पाणी बॉटल्स, बिस्कीट व अल्पोपहार यांचे मोफत वितरण दादर येथील शिवाजी पार्क मैदान येथे स्टॉल उभारून करण्यात आले.





दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ०९:०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष डॉक्टर संजय घोडके यांच्या हस्ते वितरणास सुरुवात करण्यात आली.

याप्रसंगी महापारेषण चे मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, जनसंपर्क अधिकारी मिलिंद अवताडे यांच्यासमवेत मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस संजय मोरे, जीवन गायकवाड, उपसरचिटणीस अश्वजित गायकवाड, उपाध्यक्ष शैलेश आडे, मधुकर कांबळे आदी केंद्रीय पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून विशेष सहभाग नोंदविला.

महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून गेल्या पंधरा वर्षांपासून सातत्याने सुरु असलेला बाटलीबंद शुद्ध पिण्याचे पाणी, आरोग्यदायी फेस मास्क व अल्पोपहार मोफत वितरणाचा हा स्तुत्य उपक्रम म्हणजे बंधुत्व जपणारा व सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणाराच आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी संघटनेच्या मुख्य कार्यालय शाखेचे अध्यक्ष गौतम कांबळे, सचिव पंकज बोरकर, संघटक सुमेध कोसोदे, कोषाध्यक्ष रंजना खैरे, रविकिरण जांभरूनकर, संजय भगत, अविनाश बोरकर, निशिगंधा बनकर, ममता कंठे, रोहण मूडशिंगीकर, आनंद गायकवाड, संतोष गवई, निशांत कांबळे, कुमारी अरिया बोरकर, विशाखा बोरकर, संदीप धाबर्डे, विकास कांबळे, प्रणय जांभूळकर, विक्की सोलंकी, सुशांत सावंत, निखिल खैरे, किमया खैरे, हर्षित खैरे आदी पदाधिकारी व सदस्यांनी विशेष सहकार्य केले.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी अभिवादन



**मुंबई/प्रतिनिधी** : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस महापारेषणचे महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे मौलिक विचार याविषयीची माहिती सांगितली.

याप्रसंगी कार्यकारी अभियंता श्री. अविनाश बोरकर, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) तथा राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. संदीप सुरवसे, सहाय्यक अभियंता श्री. अनुराग रांगणकर यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## अपर जिल्हाधिकारी श्रीमती सुचिता भिकाने यांना सेवारत्न पुरस्कार



**मुंबई/प्रतिनिधी** : साईदिशा प्रतिष्ठान व आयटीएसएफ यांच्या वतीने शासकीय सेवा विभागात दिला जाणारा सेवारत्न पुरस्कार अपर जिल्हाधिकारी तथा महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांनी नुकताच स्वीकारला. केंद्रीय सांस्कृतिकमंत्री श्री. गजेंद्रसिंह शेखावत व राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. आशिष शेलार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

माटुंगा येथील यशवंत नाट्य मंदिरात आयोजिलेल्या २५ व्या नटसम्राट बालगंधर्व पुरस्कार वितरण सोहळ्यात श्रीमती भिकाने यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी अभिनेते मकरंद देशपांडे, मुरली शर्मा, पार्श्वगायक कुमार शानू, सई ताम्हणकर, भाऊ कदम, सिध्दार्थ जाधव, साईदिशा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष दत्तात्रय माने उपस्थित होते.

श्रीमती भिकाने यांनी उत्कृष्ट शासकीय सेवेबरोबरच प्राण्यांची देखभाल, गोरक्षा, निसर्गसंरक्षणासाठी मोठे काम केले आहे. विशेषतः रस्त्यावरील भटक्या प्राण्यांसाठी व पर्यावरण संवर्धनासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतलेला आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उत्कृष्ट काम केले आहे. सांगलीमध्ये रोजगार हमी योजना, जलयुक्त शिवार अभियान व शतकोटी वृक्ष लागवडीमध्ये त्यांनी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या या कामांमुळे उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी पुरस्काराने यापूर्वीच त्यांना गौरविले आहे.

## पानगाव येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना काँग्रेस उमेदवार व पदाधिकाऱ्यां कडून अभिवादन

**पानगाव/प्रतिनिधी** : भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पानगाव येथील चैत्यस्मारक परिसर भाविकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी भरून गेला होता. यानिमित्त रेणापूर नगरपंचायत निवडणुकीतील काँग्रेस पक्षाचे उमेदवार, निरीक्षक, पदाधिकारी तसेच स्थानिक कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून अस्थी कलशाचे दर्शन घेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली.

चैत्यस्मारकात सकाळपासून भाविकांची गर्दी पाहायला मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी कलशासमोर उपस्थित सर्वांनी शांततेत उभे राहून महामानवांच्या कार्याची आणि त्यागाची आठवण केली. काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी या प्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर जपलेल्या समानता, शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक न्याय या मूल्यांवर आधारित आपली वाटचाल राहील असा संकल्प केला.

यावेळी जिल्हा बँकेचे व्हा चेअरमन प्रमोद जाधव, रेणाचे संचालक चंद्रचूड चव्हाण,पदम पाटील, सुरेश लहाने, प्रदीप (राजू)माने,सचिन माटेगावकर,रमेश सूर्यवंशी, भूषण पनुरे, अजय चक्रे, रहीम पठाण, संतोष शिंदे,काळे प्रदीप, हिरामण राठोड,प्रशांत अकनगिरे, गोविंद भोकरे,अतूल कातळे,संतोष शिंदे, पाशामियां शेख, सचिन इगे,गजेंद्र चव्हाण,राठोड विलास,संतोष कोल्हे,गणेश ठावरे,गणेश कलाल आदींची उपस्थिती होती.

# गुलालाच्या प्रतिक्षेतील उमेदवारांना पून्हा प्रतिक्षा

## नगरपालिका निवडणुकीत पहील्यांदाच घडले

## ना.. मतदान.. ना.. निकाल... निलंग्यात शांतता...

**निलंग/अयुब बागवान** : प्रशासकीय यंत्रणा सज्ज, मतपेट्या घेऊन जाण्यासाठी अधिकारी, कर्मचारी हजर काही तासातच मतदान होणार मतमोजणीतून विजयी उमेदवाराला गुलाल लागणार असे स्वप्न रंगवत प्रचारात गुंतलेल्या उमेदवाराच्या कानावर निवडणुका पुढे ढकलल्या हा संदेश शहरात वाऱ्यासारखा पसरला अन् गेल्या कांही दिवसापासून मतदारांना सांभाळता.. सांभाळता नाकी नऊ आलेल्या पक्षाचे नेते अन उमेदवाराला धक्काच बसला काही उमेदवारांना तर अश्रू अनावर झाले एक प्रकारे गेल्या अनेक वर्षापासून गुलालाच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवाराला पुन्हा गुलालाची प्रतीक्षा करण्याची वेळ आली. आज मतदान होते मात्र निवडणूका पुढे ढकल्याने ना मतदान.. ना.. निकाल.. दिवसभर स्पीकरद्वारे गोंगावणारे प्रचाराची प्रक्रिया थांबल्याने शहरात शांतता दिसत होती.




मागील नऊ वर्षापासून निवडणुकीच्या प्रतितक्षेत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीला कसंतरी मुहूर्त मिळाला होता निवडणुका जाहीर झाल्या सर्वच पक्ष व इच्छुक उमेदवार कामाला लागले निलंगा नगरपालिका राजकीय दृष्ट्या संवेदनशील नगरपालिका आहे. क वर्ग दर्जा असलेल्या या नगरपालिकेत ११ प्रभाग आहेत या प्रभागातून २३ नगरसेवक व थेट जनतेतून चोविसावा नगराध्यक्ष मतदारांना निवडून द्यायचा आहे. मागील चार वर्ष प्रशासकाचा काळ असल्यामुळे अनेक ठोस निर्णय घेण्यासाठी बंधने येत असतात त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका घेणे आवश्यक आहे. अनेक उमेदवारांनी झाडून प्रचार केला, कार्नर बैठका, जाहीर सभा, पदयात्रा, मतदारांच्या घरोघर भेटी यामुळे राजकीय वातावरण ढवळून निघाले होते. आठ दिवसापासून सुरु प्रचार केला मात्र कांहीही सर्व प्रचार निष्फळ ठरला. निवडणूक काळात उमेदवारांना प्रचार करण्यासाठी कालावधी कमी होता मात्र आता चार डिसेंबर रोजी नवीन कार्यक्रम जाहीर होणार आहे. वातातीत प्रभाग आठ अ व नऊ अ त्याचबरोबर नगराध्यक्ष पदाचे उमेदवारांना आपला अर्ज मागे घेण्यात येणार असल्याने नगराध्यक्ष पदासाठी सात उमेदवार निवडणूक रिंगणात असून यातील कांही उमेदवार माघार घेणार की अशीच निवडणूक लढवणार याकडे लक्ष लागले आहे.

## दयानंद कला महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भावपूर्ण अभिवादन

**लातूर/प्रतिनिधी** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दयानंद कला महाविद्यालयात भावपूर्ण अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी भूषविले.

महाविद्यालयात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी महाविद्यालयात आदरभावना व कृतज्ञतेचे वातावरण निर्माण झाले.

प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टीपूर्ण विचारांचे महत्त्व विशद केले. ''न्याय, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीसाठी डॉ. बाबसाहेब आंबेडकरांनी दिलेले विचार आज अधिक महत्त्वाचे आहेत. विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्यांचे पालन करून जबाबदार नागरिक बनावे,'' असे आवाहन या वेळी त्यांनी केले.

महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी यांनी आपल्या मनोगतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणप्रेम, महिलांच्या हक्कांसाठी केलेले कार्य आणि सामाजिक परिवर्तनासाठी दिलेल्या योगदानाचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनाला योग्य दिशा द्यावी, असे विचार त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास आयक्यूएसी समन्वयक डॉ. संतोष पाटील, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, कार्यालयीन अधीक्षक श्री. संजय व्यास, प्राथमिक शिक्षक प्रशिक्षणासाठी उपस्थित असलेल्या श्रीमती शकुंतला चौदंते, श्रीमती सविता चरलेवाड, श्री. सखाहरी पापंटवार, श्री. बालाजी अंबुलगे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींनी भारावलेल्या वातावरणात हा अभिवादन कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात यशस्वीपणे संपन्न झाला.

# युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त लातूर शहरात अभिवादन

**लातूर/प्रतिनिधी** : बहुजन उद्धारकर्ते, विश्वभूषण, विश्वरत्न, आधुनिक नवभारताचे शिल्पकार परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरात अत्यंत श्रद्धा आणि कृतज्ञतेच्या वातावरणात अभिवादनाचा कार्यक्रम पार पडला. सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्यावतीने हा कार्यक्रम आयोजित केला होता.

प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे समितीच्यावतीने अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महामानव बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

यानंतर पु.भिक्खू संघाने उपस्थितांना त्रिसरण व पंचशील देऊन समाजातील नैतिकता, सामूहिक एकता आणि मानवतावादाचा संदेश दिला.




या प्रसंगी भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक नवभारताचे निर्माते आहेत. ६९ वर्षांपूर्वी त्यांचे महापरिनिर्वाण झाले आणि त्याक्षणी भारताने एक अद्वितीय प्रतिभा, तत्त्वज्ञ आणि जननायक गमावला. त्यांच्या जाण्याने वंचित, शोषित, पीडित समाज पोरका झाला. परंतु आजही त्यांचे संविधान आणि दिलेला बुद्ध धम्म ही आमची पिढ्यानपिढ्यांची शिदोरी आहे. ०६ डिसेंबर हा दिवस प्रत्येकासाठी अत्यंत वेदनादायी असून, करोडो लोकांच्या मनावर आजही त्याचा खोल परिणाम जाणवतो. बाबासाहेबांचा संपूर्ण जीवनप्रवास हा केवळ एका व्यक्तीचा संघर्ष नव्हता, तर तो संपूर्ण मानवजातीच्या मुक्तीचा दिव्य संदेश होता. त्यांनी आयुष्यभर शोषित, पीडित, वंचित समाजाला आवाज दिला, स्वाभिमान दिला आणि माणूस म्हणून उभं राहण्याची ताकद दिली. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणाने ६९ वर्षांपूर्वी देशाने एक युगप्रवर्तक विचारवंत गमावला, पण त्यांचे ध्येय, त्यांची तत्वनिष्ठा आणि मानवतावादी दृष्टी आजही अधिक तेजस्वीपणे मार्गदर्शक आहे.

कार्यक्रमा दरम्यान दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून महामानवांना सामूहिक आदरांजली अर्पण करण्यात आली. ''अमर रहे अमर रहे बाबासाहेब अमर रहे!'' या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

या प्रसंगी भंते बोधिराज, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, शिक्षक आमदार विक्रम काळे, युवा नेते अजित पाटील कव्हेकर, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार महादेव चिकटे, डी. एस. नरसिंगे, प्रोफेसर डॉ. संजय गवई, भीमराव चौदंते, अनंत लांडगे, मोहन माने, चंद्रकांत चिकटे, राहुल कांबळे, ज्योतिराम लामतुरे, केशव कांबळे, विनय जाकते, वैभव गायकवाड, डॉ. विजय अजनिकर, चिंटू गायकवाड, डी उमाकांत, निखिल गायकवाड, करण ओव्हाळ, राहुल शाक्यमुनी, सचिन गायकवाड, ॲड. रोहित सोमवंशी, डॉ. जितेंद्र वाघमारे, सिद्धांत चिकटे, मिलिंद धावारे, सुजाता अजनिकर, पंचशीला बनसोडे, विद्या ससाणे, सुनीता सोनकांबळे, निर्मला मधाळे, सुमन उडानशिव यांच्या सह समाजातील प्रतिष्ठित मान्यवर, डॉक्टर, वकील, महार बटालियनचे आजी-माजी सैनिक, कर्मचारी तसेच महाविहार धम्मसेवक ग्रुपचे सदस्य, भारतीय बौद्ध सभेचे सर्व पदाधिकारी तथा बौद्ध उपासक उपासिका यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अभिवादन केले.

# महात्मा बसवेश्वरमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन

**लातूर/प्रतिनिधी** : महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील जयंती उत्सव समिती आणि कार्यालय यांच्यावतीने महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे यांच्या हस्ते महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रोफेसर डॉ. संजय गवई, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. शितल येरूळे, प्रा. माधव नायने, कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे आणि रत्नेश्वर स्वामी यांची उपस्थिती होती.

यावेळी नामदेव बेंदरगे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट सांगितला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे यांनी महापुरुषांचे विचार आचरणात आणले पाहिजेत तरच समाजाची उन्नती होईल असे आपल्या मनोगतात व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी तर आभार स्टाफ सेक्रेटरी डॉ. रत्नाकर बेडगे यांनी मानले.



यावेळी रंगनाथ लांडगे, विनोद दाभाडे, संभाजी लातूरे, सोपान सुतार, ओमकार बोळशेट्टे, योगेश मस्के, अजय गायकवाड, रंगनाथ लांडगे आणि गुरुप्रसाद बिरादार यांनी परिश्रम घेतले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# देशाच्या आर्थिक विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार महत्त्वाचे- प्रा. डॉ. मारुती अभिमान लोंढे



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- देशाचा आर्थिक विकास घडवून आणायचा असेल तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तळागाळातील माणूस केंद्रबिंदू माणून त्याच्या आर्थिक कल्याणाचा विचार केला आहे. शेती, उद्योग, मजूर , रुपयाची समस्या अशा अनेक क्षेत्रांमध्ये त्यांनी आपले आर्थिक विचार मांडलेले आहेत. देशाचा खऱ्या अर्थाने विकास करावयाचा असेल तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार महत्त्वाचे आहेत असे प्रतिपादन रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. मारुती अभिमान लोंढे यांनी आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर उप परिसर धाराशिव येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर उप परिसर धाराशिव येथे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महानिर्वाण दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन केले होते.याप्रसंगी प्रा. डॉ.लोंढे बोलत होते. ते पुढे म्हणाले की, कौशल्य विकास , चलनाचे विमुद्रीकरण इत्यादी अनेक बाबींवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महत्त्वपूर्ण विचार मांडलेले आहेत. वित्त आयोग हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पीएच.डीसाठी लिहिलेल्या प्रबंधावर आधारित असल्याचे दिसून येते असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष उप परिसराचे संचालक प्रोफेसर डॉ. प्रशांत दीक्षित हे होते. त्यांनी अध्यक्षीय म्हणून व्यक्त करताना , डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे नेते नव्हते, तर ते बहुआयामी व्यक्तिमत्व होते.पत्रकारिता ,राजकीय क्षेत्र ,अर्थशास्त्र , समाजशास्त्र , विधीतज्ञ अशा अनेक क्षेत्रांमध्ये त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी विकास विभागाद्वारे करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री विश्वास कांबळे यांनी केले तर आभार विद्यार्थी विकास विभागाचे समन्वयक डॉ. गणेश शिंदे यांनी मानले.

याप्रसंगी सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रम विद्यापीठ उप परिसराचे संचालक प्रोफेसर डॉ.प्रशांत दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

# उद्धारकर्त्या महामानव भीमरायास लेकरांची मानवंदना: समता सैनिक दलाने दिली सलामी



धाराशिव (प्रतिनिधी) – भारतरत्न, प्रज्ञासूर्य, महामानव, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त धाराशिव शहरातील पूर्णाकृती पुतळ्यास भीम अनुयायांनी विविध उपक्रमाद्वारे आपल्या उद्धारकर्त्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल व इतर विविध सामाजिक संघटना तसेच भीम अनुयायांनी कृतिशील उपक्रमांद्वारे दि.६ डिसेंबर रोजी अभिवादन केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पहाटे १२ वाजल्यापासूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी भिम अनुयायांनी गर्दी केली. तर सकाळी ९.३० वाजता भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने सार्वजनिक बुद्ध वंदना घेण्यात आली. तर समता सैनिक दलाच्यावतीने महामानवास सलामी देऊन मानवंदना देण्यात आली. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे दक्षिण जिल्हाध्यक्ष राजश्री कदम, जिल्हा सचिव विजय बनसोडे, बौद्धाचार्य बाबासाहेब बनसोडे, धनंजय वाघमारे तालुकाध्यक्ष, तालुका अध्यक्ष उमाजी गायकवाड, कोषाध्यक्ष संतोष झेंडे, समता सैनिक दलाचे जिल्हा सचिव सचिन दीलपाक, स्वराज जानराव, सिध्दार्थ बनसोडे, पृथ्वीराज चिलवंत, अतुल लष्करे, प्रशांत सोनवणे, विशाल शिंगाडे, प्रसेना प्रतिष्ठानचे संदीप बनसोडे, पुष्पकांत माळाळे, धनंजय शिंगाडे, शिवसेना धाराशिव शहर प्रमुख सोमनाथ गुरव, रवी वाघमारे, धम्मपाल शिंगाडे, प्रशांत पांडागळे, सौरभ शिंगाडे, संदीप बनसोडे, सुधीर वाघमारे, काटे, प्रतीक चंदनशिवे, मारुती पवार, काँग्रेस ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष धनंजय राऊत आदींसह भीम अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**एक वही, एक पेन देऊन अभिवादन**

बहुजन विद्यार्थी सामाजिक संघटनेच्या माध्यमातून एक वही, एक पेन अभियान राबविण्यात आले. या अभियानाचे हे तिसरे वर्ष आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे या उपक्रमास भीम अनुयायांनी मोठा प्रतिसाद दिला. यावेळी संघटनेचे अध्यक्ष स्वराज जानराव, भैय्यासाहेब नागटिळक, मृत्युंजय बनसोडे, प्रवीण बनसोडे, पृथ्वीराज चव्हाण, अक्षय जोगदंड, संदीप बनसोडे, स्वप्नील शिंगाडे, सतीश बनसोडे, शितल चव्हाण, महादेव भोसले, संजय थोरात, आकाश जानराव, सचिन दिलपाक, अतुल लष्करे आदी उपस्थित होते.

समरसत्ता मंचची रक्तदानाने मानवंदना

**सामाजिक समरसत्ता मंचची रक्तदानाने मानवंदना**

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त केसरिया प्रतिष्ठान व सामाजिक समरसत्ता मंच धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिरात २३ दात्याने रक्तदान करून महामानवास अभिवादन केले.

धाराशिव शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकात आयोजित रक्तदान शिबिरास समरसता मंचाचे जिल्हा संयोजक ड सचिन सुर्यवंशी, ड कृष्णा मसलेकर, गतविधी विभाग मंडळ सदस्य तुकाराम डोलारे, प्रशासकीय अधिकारी संपर्क प्रमुख राजेंद्र कापसे, यशवंत शहापालक, विश्वास कांबळे, डॉ हर्षल डंबळ तर सोलापूर येथील डॉ हेगडेवार रक्तपेढीचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ आनंद वैद्य, जनसंपर्क अधिकारी रविकुमार कोटा, अनुजा शिंदे, सौख्या देसाई आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


# प्रतिकूल परिस्थितीत ३४,५०२ हे. हरभरा पेरणी: अर्थकारणाला बळ

कळंब (प्रतिनिधी)- अतिवृष्टीमुळे यंदाच्या रब्बी हंगामातील पेरणीला उशीर झाला असला तरी कळंब तालुक्यातील शेतकऱ्यांनी पेरणीचा वेग कमी न करता मुख्य रब्बी पीक असलेल्या हरभऱ्याची तब्बल ३४,५०२ हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण केली आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शेतकऱ्यांनी दाखवलेला निर्धार हा तालुक्याच्या कृषी अर्थकारणाला बळकटी देणारा ठरत आहे.

कळंब तालुक्यात हंगामी शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. खरीप व रब्बी हे दोन्ही प्रमुख पीक हंगामात विविध पिके घेतली जातात. कळंब तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ९६,०२० हेक्टर, तर लागवडीखालील क्षेत्र ९२,२०६ हेक्टर आहे. खरीप हंगामात ७०,४०० हेक्टर आणि रब्बीमध्ये ६२,८०० हेक्टर क्षेत्रात पिके घेतली जातात. तालुक्यातील ६५,००० शेतकरी शेतीवर अवलंबून असून सोयाबीन, कापूस, ज्वारी, मुग, हरभरा व गहू ही महत्त्वाची पिके आहेत. वाढत्या शेतीखर्चामुळे पारंपरिक शेती तोट्यात जात असल्याने शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नवे प्रयोग करत आहेत. सूक्ष्म सिंचन साधनांच्या वाढत्या वापरामुळे कमी पाण्यात जास्त क्षेत्र सिंचनाखाली येत असून उत्पादनक्षमता वाढीस मदत होत आहे.

तालुक्यात कडधान्याच्या क्षेत्रात काही घट दिसत असली तरी सोयाबीन लागवड मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे कळंब तालुका 'सोयाबीनचे कोठार' म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. रब्बी हंगामात हरभरा हे मुख्य पीक असल्याने मागील काही वर्षांपासून त्याच्या पेरणीत सातत्याने वाढ होत आहे. यंदाच्या उशिरा झालेल्या पेरणीमुळे उत्पादनावर काहीसा परिणाम होण्याची शक्यता असली तरी पुढील हवामान अनुकूल राहिल्यास हरभरा उत्पादनातून शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा कृषी विभागाने व्यक्त केली आहे. कळंब तालुक्यातील एकूण कृषी अर्थव्यवस्थेला यामुळे नवे बळ मिळणार आहे. बदलत्या काळानुसार नवनवीन प्रयोग शेती मध्ये होऊ लागले आहेत. मागील काही वर्षांपूर्वी खरीप पाठोपाठ रब्बी हंगामातील क्षेत्र झपाट्याने वाढत गेलेले आहेत. हरभरा हे रब्बी हंगामातील एक मुख्य पीक आहे. त्यामुळे प्रती वर्षी हरभऱ्याचा पेरा वाढत चालला आहे.

उस लागवडीकडे शेतकऱ्यांचा वाढता कल कळंब तालुक्यातील शेतकऱ्यांचा कल आता ऊसाकडेही वाढत चालला आहे. सध्या ११०१३ हेक्टरवर खोडव्याची नोंद असून ७८३ हेक्टरवर नवीन लागवड करण्यात आली आहे. यामुळे उसाच्या क्षेत्रातही लक्षणीय वाढ होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

पुढील काही दिवसांत राजमाच्या पेरणीत वाढ तालुक्यातील १७ गावांत पूर्वी निश्चित रब्बी क्षेत्र होते. पण अलीकडील काळात हे क्षेत्र झपाट्याने वाढले आहे. हरभऱ्यानंतर सर्वाधिक वेगाने वाढणारे क्षेत्र म्हणजे राजमा. यावर्षी ७५८६ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर राजमाची लागवड झाल्याची नोंद असून पुढील काही दिवसांत हे क्षेत्र आणखी वाढण्याची शक्यता आहे.

# पार्वती कन्या प्रशाला, जळकोट येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन संपन्न



जळकोट(विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील पार्वती कन्या प्रशाला येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन संपन्न झाला. प्रथमत: डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्रशालेच्या मुख्याध्यापिका यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ.लता सोमवंशी-कदम या होत्या,आपल्या अध्यक्षीय भाषणात त्या म्हणाल्या, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य मानवतेच्या हितासाठी घालवले .समता, शिक्षण आणि न्याय या मूल्यांसाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. शिका, संघटित व्हा व संघर्ष करा हा मूलमंत्र डॉ. आंबेडकरांनी दिला. आजचा दिवस त्यांच्या या महान कार्याला स्मरण करण्याचा आहे. त्यांनी दुर्बल, शोषित मागासलेल्या घटकांना उभा करण्यासाठी शिक्षणाचा महामंत्र दिला. यावेळी प्रशालेतील विद्यार्थी कु.गायत्री राजमाने कु.राजनंदिनी जाधव .कु.आदिती माने कु.कृष्णा कदम कु.संस्कार कदम कु. सायली हिंडोळे,कु.प्रणिता लोखंडे,कु.ओम कदम कु. आदित्य कदम यांनी भाषणे केली. यावेळी प्रशालेतील शिक्षक श्री. विजय मोरे श्री बसवराज मडोळे श्री अभिमन्यू कदम श्रीम. सुजाता होटकर श्रीम. रोहिणी तळेकर श्री सचिन गुडड् उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता आठवीतील विद्यार्थी कु. शुभम कदम व कु. आदर्श बिराजदार यांनी केले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम गीताने झाली.

# लिफ्ट देण्याचे बहाण्याने २० ग्रॅम सोन्याचे दागिने लुटले

धाराशिव (प्रतिनिधी)-ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत केशरबाई , रा. जुने रेल्वे स्टेशन रामलिंग येडशी ता. जि. धाराशिव या दि.१४.१० रोजी बार्शी ते लातुर रोडवर गणेश हॉटेल समोर येडशी येथे पायी जात होत्या अज्ञात व्यक्तीने फिर्यादी यांना चार चाकी वाहनामध्ये लिफ्ट देण्याचे बहाण्याने २० ग्रॅम सोन्याचे दागिने एकुण८०,००० किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- केश्रबाई नागटिळक यांनी दि.०५.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## आर्मीचर व ट्रॅक्टर स्टॅण्डची अज्ञाताने केली चोरी: गुन्हा दाखल

परंडा पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी राहुल महादेव लोखंडे, आष्टा ता. भुम जि. धाराशिव यांचे आष्टा शिवारातील शेत गट नं २६४ चे विहीरीजवळ विद्युत मोटारी करीता आणलेले आर्मीचर व ट्रॅक्टर स्टॅण्ड एकुण ५०,००० किंमतीचे अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **INAMDAR MEHRUNISA BEGAM MANSOOR ALI** TO: **MEHARUNISSA BEGAM MANSUR ALLI INAMDAR**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **INAMDAR MEHRUNISA BEGAM MANSOOR ALI** in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **INAMDAR MEHRUNISA BEGAM MANSOOR ALI INAMDAR**
NEW NAME :- **MEHARUNISSA BEGAM MANSUR ALLI INAMDAR**
Address - Naldurg Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar n.-721778254420 Mob.9422655654


# भजन, भारूड, पूजा, अभिषेकातून भक्तिरंग: अचलेर येथे दत्त जयंती उत्सव उत्साहात साजरा



अचलेर लोहारा तालुक्यातील अचलेरमधील दत्तनगर चौकातील मंदिरात दत्त जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

बुधवारी सायंकाळी अचलेर येथील विठ्ठल हरी भजनी मंडळ यांच्यावतीने भजनाचा भक्तिरसपूर्ण कार्यक्रम सादर करण्यात आला. सुरेल अभंग,भारुडाने व नामस्मरणामुळे वातावरण मंगलमय झाले.भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भजन कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दुसऱ्या दिवशी म्हणजेच गुरुवारी सकाळी श्री दत्त मंदिरात विधिवत अभिषेक, पूजा-अर्चा व मंत्रोच्चारांच्या निनादात धार्मिक विधी पार पडले. पूजा-अभिषेकानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामस्थांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी बायस परिवार व मित्र मंडळ तसेच अचलेर ग्रामस्थांनी सहकार्य केले. ग्रामस्थांच्या एकत्रित सहभागामुळे उत्सव अधिक उत्साहात पार पडला.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649